दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६७ | बुधवार दि.२७ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### झुरळापासून न्यायालयापर्यंत एका वक्तव्याचे पडसाद

भारतीय लोकशाहीची एक मोठी ताकद म्हणजे येथे प्रत्येक काळात समाजातील अस्वस्थता वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत राहते. कधी आंदोलने होतात, कधी साहित्य जन्माला येते, कधी व्यंगचित्रे निर्माण होतात, तर कधी सोशल मीडियावर एखादी उपहासात्मक चळवळ उभी राहते. 'कॉक्रोच जनता पार्टी' हे असेच एक आधुनिक प्रतीक ठरले आहे. वरकरणी ही एक विनोदी, उपरोधिक आणि इंटरनेटवरची क्षणिक घटना वाटू शकते; पण तिच्या मागे दडलेले वास्तव अत्यंत गंभीर आहे.

# शेतकरी कर्जमाफीला निवडणूक आयोगाचा हिरवा कंदील

## ३० जूनपूर्वी अंमलबजावणीची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा मार्ग आता मोकळा झाल्याची माहिती समोर येत आहे. विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू झालेल्या आचारसंहितेमुळे कर्जमाफी प्रक्रिया रखडणार का, असा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र केंद्रीय निवडणूक आयोगाने या योजनेला मंजुरी दिल्याचे वृत्त समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.**



राज्यात सध्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून १८ जून रोजी मतदान होणार आहे. निवडणूक आचारसंहितेमुळे सरकारच्या महत्त्वाच्या निर्णयांवर निर्बंध लागू होतात. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयालाही विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. राज्यातील लाखो शेतकरी या निर्णयाकडे आशेने पाहत असल्याने राजकीय वर्तुळातही या विषयावर मोठी चर्चा सुरू होती. दरम्यान, राज्य सरकारने कर्जमाफीसंदर्भातील प्राथमिक तयारी यापूर्वीच सुरू केली होती. पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करणे, बँकांकडून थकीत कर्जाचा तपशील मागवणे तसेच आर्थिक तरतुदींची तयारी यावर प्रशासनाकडून काम सुरू असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे सरकार कर्जमाफीबाबत गंभीर असल्याचे संकेत मिळत होते. याच ▶▶ पान २ वर

# महागाईचा उच्चांक गाठणारा!

## इंधनानंतर आता दूध, तेल, भाज्या, डाळींसह सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

इराण युद्धामुळे भडकत चाललेल्या महागाईच्या आगीत तेल कंपन्यांनी दोन आठवड्यात सलग चौथ्यांदा पेट्रोल-डिझेल ओतल्याने ही महागाई आता स्वयंपाकघरात थेट ताटावर येऊन बसली आहे. इंधन महागल्याने भाजीपाला कडाडला, खाद्यतेल तडकले आणि किराणा मालाचे दरही वाढलेले दिसत आहेत. जनतेचा रोजचे जगणे आता महाग होत चालले असून, महागाईच्या या चिंतेने राज्यातील नागरिकांना ग्रासलेले दिसते आहे. येत्या काही दिवसांत महागाई देशात उच्चांक गाठण्याची शक्यता आहे.

सोमवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अनुक्रमे २.६१ रुपये आणि २.७१ रुपये प्रतिलिटरने



वाढ करण्यात आली आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढल्याने सरकारी तेल कंपन्यांनी हा निर्णय घेतला आहे. गेल्या दोन आठवड्यांतील ही चौथी दरवाढ आहे. इंधन दरातील ही वाढ १५ मेपासून सुरू झाली असून, आतापर्यंत पेट्रोल ▶▶ पान २ वर

### काय काय होणार महाग?

सीएनजी किलोमागे ३ ते ४ रुपयांनी महागल्याने मालवाहतुकीचे दर वाढले आणि वस्तूंचे दरही बदलले. अमूल, मदर डेअरी आणि गोकुळ या तिन्ही कंपन्यांचेदूधही लिटरमागे दोन रुपयांनी वाढले आहे. पॅकबंद तांदुळ गुणवत्तेनुसार ४२ ते १५० रुपये किलोने घ्यावा लागत आहे. प्राप्त संकेतानुसार बाटलीबंद पाणी कोणत्याही क्षणी महागण्याची शक्यता आहे. एक लिटरची बाटली २० रुपयांवरून २५ वर तर ५०० मिली लीटरची बाटली १० वरून १२ रुपयांवर जाऊ शकते. रोज लागणारा अंघोळीचा साबण, कपडे धुण्याचा साबण/पावडर, पॅकबंद अन्न पदार्थ आणि घरगुती अत्यावश्यक वस्तूंचे दर एफएमसीजी कंपन्यांनी वाढवले आहेत.

# केंद्र सरकारकडून नवे आधार ॲप लाँच

## एम–आधार लवकरच बंद होणार !

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारने जुने एम–आधार ॲप लवकरच बंद करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. त्याऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण कडून आधार सेवा अधिक सुरक्षित, जलद आणि अत्याधुनिक फीचर्स असलेले नवीन आधार ॲप सुरू करण्यात आले आहे. युजर्सचा वैयक्तिक डेटा अधिक सुरक्षित ठेवणे आणि डिजिटल पडताळणीची प्रक्रिया अधिक सोपी व आधुनिक करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

युआयडीएआय च्या




अधिकृत एक्स खात्यावरून याबाबत माहिती देण्यात आली. एमआधार लवकरच बंद होणार आहे. नवीन आधार ॲप डाउनलोड करा आणि अधिक वेगवान सेवा, स्मार्ट फीचर्स आणि ▶▶ पान २ वर

# सामान्यांचे कंबरडे मोडणार ; आता लालपरीचे तिकीटही महागणार

## मंत्री सरनाईक यांनी दिले संकेत, इंधन दरवाढ झाल्याचा परिणाम

मुंबई । प्रतिनिधी

देशात डिझेल दर वाढीचा मोठा फटका लालपरीला मोठ्या प्रमाणावर बसत आहे. डिझेल वाढीमुळे एसटीचा प्रवास महागणार असल्याची शक्यता दिसून येत आहे. डिझेल वाढीमुळे आतापर्यंत एसटी महामंडळाच्या खर्चात तब्बल ३१० कोटींची वाढ झाली आहे. याआधी ३३०० कोटी रुपयांचा खर्च महामंडळाचा डिझेलवर होत होता. आता याच खर्चात ३१० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. १५ मेला डिझेलची पहिली वाढ ३.१० पैशांनी झाली,



त्यावेळी १२४ कोटी रुपयांचा खर्च वाढला. दुसरी वाढ ९३ पैशांनी झाल्यानंतर ३७.२० कोटी रुपयांचा खर्च वाढला. तिसरी वाढ ९१ पैशांनी झाल्यानंतर ३६.४० रुपयांनी खर्च वाढला. चौथी दरवाढ २.८१ पैशांनी झाल्यानंतर ११२.४० कोटी खर्च वाढला. आतापर्यंत झालेल्या दरवाढीमुळे एसटी महामंडळाचा डिझेलवरील खर्च तब्बल ३१० कोटी रुपयांनी वाढला आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने मदतीचा हात पुढे केला नाही तर एसटीची भाडेवाढ अटळ आहे. तर आज शिवसेना नेते आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे. त्याचबरोबर डिझेल बचतीसाठी काही महत्त्वाच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. म्हणजेच या मागणी आता सर्वसामान्य ▶▶ पान २ वर

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

देशात सुरु असेल्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यानुसार आता शासनाला ३० जून २०२६ पर्यंत बदली प्रक्रिया राबविता येणार आहे.

यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन



आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या मसुद्यासही मंजुरी देण्यात आली. शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या ▶▶ पान २ वर

# मॉन्सूनची वाटचाल थांबली!

## विदर्भात उष्णतेची लाट तर मराठवाड्यात वादळी पावसाची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

**मॉन्सून २६ मे च्या मागेपुढे ४ दिवसात केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिलेला आहे. मात्र मॉन्सूनने मंगळवारीही प्रगती केली नाही. पण पुढील २ दिवसांमध्ये मॉन्सूनच्या प्रगतीसाठी पोषक स्थिती असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.**


मॉन्सून यंदा देशात सरासरी वेळेच्या आधी दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिलेला आहे. केरळमध्ये मॉन्सून २६ मे च्या दरम्यान मागेपुढे ४ दिवसांत दाखल होईल, असा अंदाज होता. पण २६ मे रोजी मॉन्सून केरळमध्ये दाखल झालेला नाही. मॉन्सून श्रीलंकेत होता. पण मॉन्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान असून पुढील २ ते ३ दिवसांत मॉन्सून आणखी पुढे सरकेल असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. राज्यात पुढील ५ दिवस उष्णतेटी लाट आणि काही भागात पावसाला पोषक स्थिती असल्याचे ▶▶ पान २ वर

# ८९ हजार कोटींच्या गुंतवणुकीला चालना मिळणार

## पाच अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन, मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून



विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात ▶▶ पान २ वर

# सरकारी योजनांच्या गर्दीत सामान्यांचा आक्रोश हरवला?

## तेल कंपन्याना ७७ हजार कोटींची नफा तरिही चौथ्यांदा दरवाढ




मुंबई– बीड । प्रतिनिधी

देशभरात एका बाजूला प्रमुख तेल कंपन्यांनी तब्बल ७७ हजार कोटी रुपयांचा बंपर नफा कमावला असताना, दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य जनतेच्या खिशाला मात्र सलग चौथ्यांदा इंधन दरवाढीची मोठी कात्री लागली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल स्वस्त होत असताना देशात







मात्र पेट्रोल-डिझेलचे दर गगनाला भिडत आहेत. मात्र, या गंभीर आर्थिक फटक्याकडे जनतेचे फारसे लक्ष जाऊ नये, यासाठी शासकीय योजनांचा सुरेल पडदा पुढे करण्यात आल्याची चर्चा आता राजकीय आणि आर्थिक वर्तुळात रंगू लागली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान निधी आणि मोफत अन्नधान्य वितरण यांसारख्या थेट लाभ देणाऱ्या योजनांमुळे सर्वसामान्य नागरिक सध्या या दरवाढीकडे काहीसे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. चालू आर्थिक वर्षात देशातील अग्रगण्य तेल कंपन्यांच्या नफ्यात विक्रमी वाढ झाली ▶▶ पान २ वर

> ''एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे, अशी ही अवस्था आहे. सरकारने लाडक्या बहिणींना पैसे दिले खरे, पण डिझेल-पेट्रोल महाग करून घरातील गॅस, किराणा आणि वाहतूक इतकी महाग केली की, मिळालेले पैसे कुठे गेले हे कळतच नाही.''
>
> **– मनीषा जाधव, गृहिणी.**

## थोडक्यात...

### प.बंगाल सरकार महिलांना दरमहा तीन हजार देणार

कोलकाता : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांनी राज्यातील जनतेसाठी महत्त्वपूर्ण लोककल्याणकारी घोषणांचा धडाका लावला आहे. शाळा, महाविद्यालये आणि धार्मिक स्थळांच्या एक किलोमीटर परिसरात दारूची दुकाने सुरू करण्यास सक्त मनाई असेल, असा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी जाहीर केला आहे. याशिवाय, राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी अन्नपूर्णा योजना कार्यान्वित करण्यात येत असून, त्याअंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात दरमहा ३,००० रुपयांची थेट मदत जमा केली जाणार आहे. मुख्यमंत्री अधिकारी यांनी या योजनेची अधिकृत घोषणा केली. त्यांनी सांगितले की, २७ मे पासून राज्य सचिवालयामार्फत अन्नपूर्णा योजनेसाठीचे अर्ज उपलब्ध करून दिले जातील. या योजनेचा लाभ घेण्यास सर्व भारतीय नागरिक पात्र असतील आणि अर्ज प्रक्रिया पूर्ण होताच संबंधित महिलांच्या खात्यात ३,००० रुपयांची रक्कम हस्तांतरित करण्यास सुरुवात होईल.

### ब्रह्मपुरी ठरले देशातील सर्वांत उष्ण शहर

चंद्रपूर : विदर्भ उष्ण लाटेत होरपळत आहे. गेल्या आठवडाभरापासून सूर्यदेव विदर्भावर कोपल्याचे चित्र आहे. अकरापैकी ९ जिल्ह्यांतील नागरिक उष्ण लाटेचा सामना करीत असून उन्हाचा पारा ४५ अंशांच्या पुढे आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरीत पारा ०.४ अंशाने वाढून ४७.६ अंशावर पोहोचला असून, सलग दुसऱ्याही दिवशी हे शहर देशात सर्वांत तापदायक ठरले आहे. येथील तापमान सरासरीपेक्षा ५ अंशांनी अधिक आहे. नागपूर व इतर ५ जिल्ह्यांत दिवसाचे तापमान ४६ अंशाच्यावर नोंदविण्यात आले. नागपूरचा पारा १.१ अंशाने वाढून थेट ४६.५ अंशावर उसळला असून, ब्रह्मपुरीनंतर दुसऱ्या क्रमांकाचे उष्ण शहर ठरले आहे. याशिवाय भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा शहरांचे तापमानही एकपेक्षा अधिक अंशाने वाढून ४६ अंशापेक्षा अधिक नोंदविण्यात आले आहे. दुसरीकडे अकोला, अमरावतीचा पारा ४५ अंशाच्यावर आणि यवतमाळ ४४.४ अंशावर असून उष्ण लाटेच्या प्रभावात आहे.

### सीबीएसई १२ वीचा निकाल बदलणार!

नवी दिल्ली: केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) इयत्ता १२ वीच्या निकालाबाबत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांमध्ये अदलाबदल झाल्याची गंभीर चूक सीबीएसई बोर्डाने अखेर मान्य केली आहे. सोशल मीडियावर विद्यार्थ्यांनी याविरोधात आवाज उठवल्यानंतर बोर्डाला जाग आली असून, आता संबंधित विद्यार्थ्यांचे गुण सुधारले जाणार असल्याचे बोर्डाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. वेदांत नावाच्या एका विद्यार्थ्याने निकालानंतर उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी अर्ज केला होता. त्याला मिळालेली भौतिकशास्त्राची उत्तरपत्रिका त्याची नसून दुसऱ्याच कोणा विद्यार्थ्याची असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. वेदांतने हा सर्व प्रकार सोशल मीडियावर शेअर करत बोर्डाच्या कारभारावर आक्षेप घेतला. हा घोळ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सीबीएसई प्रशासनात खळबळ उडाली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५३.५० क्विंटल | २,३०० | २,५६१ | २,३९० |
| ज्वारी/हायब्रिड: १५१.५० क्विंटल | २,१३१ | ३,८०० | २,८१२ |
| मका/लोकल: ८.५० क्विंटल | १,९४० | १,९४० | १,९४० |
| तूर : -- क्विंटल | -- | -- | -- |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: ७९.०० क्विंटल | २,१२१ | २,५०१ | २,३१८ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:-- क्विंटल | -- | -- | -- |
| हरभरा: ११.५० क्विंटल | ५,५०० | ५,८०० | ५,६८३ |

## अग्रलेख

# झुरळापासून न्यायालयापर्यंत : एका वक्तव्याचे पडसाद

भारतीय लोकशाहीची एक मोठी ताकद म्हणजे येथे प्रत्येक काळात समाजातील अस्वस्थता वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत राहते. कधी आंदोलने होतात, कधी साहित्य जन्माला येते, कधी व्यंगचित्रे निर्माण होतात, तर कधी सोशल मीडियावर एखादी उपहासात्मक चळवळ उभी राहते. 'कॉक्रोच जनता पार्टी' हे असेच एक आधुनिक प्रतीक ठरले आहे. वरकरणी ही एक विनोदी, उपरोधिक आणि इंटरनेटवरची क्षणिक घटना वाटू शकते; पण तिच्या मागे दडलेले वास्तव अत्यंत गंभीर आहे. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी या संदर्भातील याचिकेवर सुनावणी करताना ''हे प्रकरण इतक्या भावनिकतेने घेऊ नका,'' असा दिलेला सल्ला न्यायालयीन दृष्टिकोनातून योग्य असला, तरी या एका वाक्याने देशातील तरुणांच्या मनातील संताप, अपमानाची भावना आणि व्यवस्थेविषयीचा अविश्वास अधिक ठळकपणे समोर आला आहे.

लोकशाहीत भाषेचे महत्त्व अत्यंत मोठे असते. विशेषतः सर्वोच्च घटनात्मक पदांवर बसलेल्या व्यक्तींच्या शब्दांना सामान्य नागरिक वेगळ्या संवेदनशीलतेने घेतात. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी मूळ वक्तव्यात काही विशिष्ट प्रवृत्तींचा उल्लेख केला होता, असा खुलासा नंतर करण्यात आला. तथापि 'झुरळ' ही उपमा एकदा सार्वजनिक क्षेत्रात आली आणि तिने वेगळाच अर्थ धारण केला. बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांतील घोटाळे, पेपरफुटी, वाढती आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक दबाव यांच्या छायेत जगणाऱ्या तरुणांनी ही उपमा स्वतःवर झालेला सामूहिक अपमान म्हणून अनुभवली. प्रश्न इतकाच नाही की शब्दांचा गैरसमज झाला; प्रश्न हा आहे की, आजचा तरुण इतका जखमी का आहे की अशा शब्दांनी त्याच्या मनातील असंतोषाला त्वरित स्फोटक रूप मिळते. भारत हा जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक मानला जातो. सरकारे 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा गौरव करतात. मात्र वास्तवात लाखो सुशिक्षित युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक वर्षे अभ्यास करून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना पेपरफुटीच्या घटनांचा सामना करावा लागतो. परीक्षा झाल्या तरी निकालात विलंब, भरती प्रक्रियेत भ्रष्टाचार आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे तरुणांचा संयम संपत चालला आहे. खासगी क्षेत्रातही नोकरीची हमी उरलेली नाही. करार पद्धती, कमी वेतन, कामाचा प्रचंड ताण आणि सततची असुरक्षितता यामुळे शिक्षण घेऊनही भविष्य अंधारात असल्याची भावना निर्माण झाली आहे. अशा वेळी 'कॉक्रोच जनता पार्टी'सारखा उपरोधिक मंच तरुणांना स्वतःच्या वेदना व्यक्त करण्यासाठी एक प्रतीकात्मक जागा देतो. या चळवळीचे वैशिष्ट्ये म्हणजे तिने आत्म–व्यंग्याला आंदोलनाचे स्वरूप दिले. ''आम्ही बेरोजगार आहोत, ऑनलाइन सक्रिय आहोत, आम्हाला व्यवस्था गंभीरतेने घेत नाही,'' हे मान्य करत तरुणांनी उपहासालाच आपले शस्त्र बनवले. हा प्रकार वरकरणी विनोदी दिसत असला, तरी तो मानसिक आणि सामाजिक ताणाचे द्योतक आहे. जेव्हा एखाद्या पिढीला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असतो, पण व्यवस्थेवर विश्वास राहत नाही, तेव्हा ती व्यंग्याच्या माध्यमातून प्रतिकार करते. इतिहासातही उपरोध आणि विनोद हे व्यवस्थेविरोधातील प्रभावी अस्त्र राहिले आहेत. फरक एवढाच की आजचा रणांगण सोशल मीडिया आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या काही दिवसांत झालेल्या प्रचंड लोकप्रियतेकडे केवळ ''मीम कल्चर'' म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. ही लोकप्रियता दर्शवते की देशातील मोठा तरुण वर्ग मानसिकदृष्ट्या असुरक्षित आणि राजकीयदृष्ट्या निराश आहे. पारंपरिक राजकीय पक्षांकडून त्यांना उत्तर मिळत नाही. रोजगाराच्या घोषणा होतात, पण संधी कमी होत जातात. शिक्षण व्यवस्था पदवी देते, पण कौशल्य आणि रोजगार यांच्यातील दरी वाढत जाते. अशा परिस्थितीत सोशल मीडिया हा केवळ मनोरंजनाचा मंच राहत नाही; तो भावनिक विस्फोटाचा आणि सामूहिक ओळखीचा मंच बनतो. यामध्ये आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा. एखादी उपरोधिक चळवळ किंवा व्यंगात्मक पेज तात्काळ निलंबित करणे, अकाउंट्सवर कारवाई करणे किंवा त्याला राष्ट्रविरोधी ठरवण्याचा प्रयत्न करणे, ही लोकशाहीच्या आत्म्याला बाधा पोहोचवणारी प्रवृत्ती ठरू शकते. लोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही; ती असहमती व्यक्त करण्याच्या अधिकारावर टिकते. तरुण वर्ग जर राग, उपहास किंवा व्यंग्याच्या माध्यमातून आपली निराशा व्यक्त करत असेल, तर त्या अभिव्यक्तीमागील कारणे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. आवाज दाबल्याने प्रश्न संपत नाहीत; उलट ते अधिक खोलवर जातात.

या प्रकरणाने न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवरही चर्चा सुरू केली आहे. भारतीय न्यायव्यवस्था ही लोकशाहीची सर्वात विश्वासार्ह संस्था मानली जाते. अनेक वेळा न्यायालयांनी नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण केले आहे. म्हणूनच न्यायालयीन भाष्यांबाबत अपेक्षाही मोठ्या असतात. न्यायालये भावनांवर चालत नाहीत, हे खरे असले तरी समाजाच्या जखमा ओळखण्याची संवेदनशीलता त्यांच्याकडून अपेक्षित असते. विशेषतः तरुणाईसारख्या अस्वस्थ वर्गाशी संबंधित मुद्द्यांमध्ये शब्दांची निवड अधिक काळजीपूर्वक व्हायला हवी.

विरोधी पक्ष, बुद्धिजीवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या घटनेकडे फक्त राजकीय फायद्याच्या नजरेने पाहणे योग्य ठरणार नाही. हा केवळ एका वक्तव्याचा वाद नाही; हा संपूर्ण व्यवस्थेविषयीच्या अविश्वासाचा इशारा आहे. रोजगार, शिक्षण, आरक्षण, आर्थिक विषमता, कौशल्य विकास, मानसिक आरोग्य आणि सामाजिक सुरक्षितता या सर्व मुद्द्यांचा संबंध या असंतोषाशी जोडलेला आहे. जर देशातील मोठा तरुण वर्ग स्वतःला 'झुरळ' म्हणून संबोधणाऱ्या व्यंग्यात आश्रय शोधत असेल, तर ही केवळ इंटरनेट ट्रेंडची बाब नाही; ती धोरणात्मक अपयशाची घंटा आहे.

भारतीय तरुणाईला आज केवळ रोजगार नको आहे; तिला सन्मान हवा आहे. शिक्षण घेऊन, स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे झटूनही जेव्हा व्यवस्था त्यांना अनिश्चिततेच्या अंधारात ठेवते, तेव्हा आत्मविश्वास खचतो. आशा हरवली की उपरोध जन्म घेतो. 'कॉक्रोच जनता पार्टी' हा त्या उपरोधाचा चेहरा आहे. कदाचित ही चळवळ काही दिवसांनी विरून जाईल. सोशल मीडियाच्या जगात अनेक ट्रेंड येतात आणि जातात. पण या चळवळीने उभे केलेले प्रश्न कायम राहतील. बेरोजगारी कमी होईल का? भरती प्रक्रियेत पारदर्शकता येईल का? शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी भरून निघेल का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, देशातील तरुणाला पुन्हा एकदा भविष्यासंबंधी आशा वाटेल का? लोकशाहीची खरी कसोटी ही टीका सहन करण्यात असते. व्यंग्य, उपरोध आणि संताप यांनाही लोकशाहीत स्थान असते. कारण हे सर्व समाजातील वेदनेचेच वेगवेगळे आवाज असतात. 'कॉक्रोच जनता पार्टी' ही त्यापैकीच एक अभिव्यक्ती आहे. तिच्यावर हसता येईल, तिच्यावर टीका करता येईल; पण तिने मांडलेल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. कारण हे प्रश्न एका इंटरनेट पेजचे नाहीत, तर संपूर्ण पिढीच्या भविष्याचे आहेत.

---

## लोकनेते मुंडे साहेबांची पुण्यतिथी
### आपापल्या गावात, घरीच करा-ना.पंकजा मुंडे



**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे सर्वांचे श्रद्धास्थान व ऊर्जास्थान आहे. दरवर्षी तीन जून आला की प्रत्येकाच्या मनात हुरहूर लागून जाते. आपल्या लोकनेत्याच्या आठवणीने आजही लाखोंचा जनसागर गोपीनाथ गडावर तीन जूनला दाखल होतो. मात्र सद्य परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद त्याचबरोबर पेट्रोल डिझेलचा वापर कमी करून सर्वांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने गोपीनाथ गडावर न येता सर्वांनी आहे त्या ठिकाणी, आपापल्या घरात व गावात पुण्यतिथी करावी असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची ३ जून ला पुण्यतिथी असते. त्या निमित्ताने गोपीनाथराव मुंडे यांची समाधी असलेल्या गोपीनाथ गडावर दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जनसागर येत असतो.मात्र गोपीनाथराव मुंडे यांना अभिप्रेत असलेली जनकल्याणाची कामे करणे, ज्यांचा कोणी वाली नाही त्यांचा वाली होणे, ज्यांची वाणी नाही त्यांची वाणी होण्याचा प्रयत्न करणे हे विचार आपण पुढे घेऊन जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. तीन जून जवळ आला की प्रत्येकाला हुरहूर लागलेली असते. मात्र सध्य परिस्थिती पेट्रोल डिझेलचा तुटवडा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन या दृष्टीकोनातून कोणाचीही गैरसोय होणार नाही यासाठी आपण गोपीनाथ गडावर येण्याचे टाळावे.आपापल्या गावात व आपण आहात त्या ठिकाणी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी करा.त्यांच्या विचाराला साजेसे उपक्रम साजरे करा. त्यामुळे गोपीनाथ गडावर मोठा कार्यक्रम आयोजित केला जाणार नाही. सर्वांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन व पेट्रोल डिझेल वापर टाळण्यासाठी यावर्षी गावागावात पुण्यतिथी करावी असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

---

## जामखेड मध्ये अतिक्रमण हटाव मोहीम; संयुक्त कारवाईत अनेक टपऱ्या जमीनदोस्त, धनदांडग्यांना अभय?



**जामखेड । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ (डी) अंतर्गत खर्डा चौक ते बीड कॉर्नर या भागातील रखडलेले रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने मंगळवारी (दि. २६ मे) सकाळी संयुक्त अतिक्रमण हटाव मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या मोहिमेत रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या अनेक टपऱ्या आणि अतिक्रमणे हटवून तब्बल १२० फूट रस्ता मोकळा करण्यात आला. प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.**

या कारवाईत तहसीलदार धनंजय बांगर, मुख्याधिकारी अजय साळवे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमी अभिलेख विभाग, महावितरण, पोलीस प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित होते. नगरपरिषदेचे कर्मचारीही मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी झाले होते. खर्डा चौक ते बीड कॉर्नर या भागातील अतिक्रमणांमुळे राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम दीर्घकाळ रखडले होते. भूमी अभिलेख विभागाने सीमांकन आणि मोजणी पूर्ण केल्यानंतर अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया वेगाने राबविण्यात आली. रस्ता कामात अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर प्रशासनाने थेट बुलडोझर चालवत कारवाई केली. मोहिमेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अतिक्रमण हटविण्यासाठी पोकलेन, जेसीबी, डंपर आणि आवश्यक मनुष्यबळ कंत्राटदारांकडून उपलब्ध करून देण्यात आले, तर नगरपरिषदेकडून सफाई कर्मचारी आणि कचरा वाहनांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. या धडक कारवाईत अनेक टपऱ्या जमीनदोस्त करण्यात आल्याने परिसरातील रस्ता पूर्णपणे मोकळा करण्यात आल्याचा दावा प्रशासनाने केला.

### 'गरीबांवर कारवाई, धनदांडग्यांना अभय? सामाजिक कार्यकर्त्यांचा सवाल

या कारवाईवर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी म्हटले की, ''विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या स्पष्ट निर्देशानंतर बीड कॉर्नर ते खर्डा चौक या १२० फूट रस्त्यातील अतिक्रमणांवर कारवाई सुरू झाली, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र समर्थ हॉस्पिटल ते बीड कॉर्नर या भागातील हद्द निश्चित झाल्यानंतरही तेथील अतिक्रमणांवर कारवाई झाली नाही. त्यामुळे धनदांडग्यांना वाचवून सर्वसामान्यांवर अन्याय होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.'' पवार यांनी पुढे स्पष्ट शब्दांत इशारा देत म्हटले की, ''अतिक्रमण हटावाची कारवाई होत असेल, तर ती सर्वांसाठी समान असली पाहिजे. नियम गरीबांसाठी वेगळे आणि श्रीमंतांसाठी वेगळे असतील, अशी भावना निर्माण होणे धोकादायक आहे.'' प्रशासनाच्या या कारवाईनंतर आता उर्वरित भागातील अतिक्रमणांवरही बुलडोझर चालणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---



## पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात सत्कार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**आपल्या समर्पित लोकसेवेने महाराष्ट्राची मान राष्ट्रीय पातळीवर उंचावणारे पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात आज एक विशेष कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला यांच्याहस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.**

महाराष्ट्र सदनात आयोजित या सोहळ्याला माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक प्रमोद कोलपते उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना श्री. बोथे म्हणाले,देशाच्या राजधानीत आणि विशेषतः आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र सदनात झालेला हा सत्कार माझ्यासाठी घरच्या कौतुकासारखा आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नसून, माझ्या जीवनात आलेले महान संत, स्वातंत्र्यसेनानी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा आणि कार्याचा हा गौरव आहे. महाराजांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या गुरुकुंज आश्रमातून हजारो विद्यार्थी आणि कार्यकर्ते देशाची संस्कृती, अध्यात्म आणि राष्ट्रप्रेम जगवण्यासाठी अविरत काम करत आहेत. त्या गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत मला काम करण्याची संधी मिळाली, म्हणूनच आज मी इथपर्यंत पोहोचू शकलो असेही त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी बोलताना निवासी आयुक्त आर. विमला यांनी जनार्दन बोथे यांच्या कार्याचा गौरव केला. महाराष्ट्राच्या मातीतून देशपातळीवर चमकणाऱ्या अशा ज्येष्ठ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करण्याची संधी महाराष्ट्र सदनाला मिळाली, हे आमचे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. माहिती संचालक हेमराज बागुल यांनी बोथे यांचे सामाजिक कार्य या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र सदनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

---

## पान १ वरून...

### शेतकरी कर्जमाफीला निवडणूक

पार्श्वभूमीवर राज्याचे कृषिमंत्री यांनीही शेतकऱ्यांना दिलासा देणारे वक्तव्य केले होते. निवडणूक प्रक्रिया सुरू असली तरी शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयात कोणताही अडथळा येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. सरकारने घेतलेला निर्णय कायम असून पात्र शेतकऱ्यांना निश्चित दिलासा दिला जाईल, असेही त्यांनी म्हटले होते. आता केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मंजुरी मिळाल्याची माहिती समोर आल्यानंतर कर्जमाफीच्या अंमलबजावणीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. त्यामुळे ३० जूनपूर्वीच कर्जमाफीची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. विशेषतः आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सरकार लवकरच अधिकृत आदेश काढून कर्जमाफीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

--------------

### केंद्र सरकारकडून नवे आधार ॲप लाँच

सोपी आधार सुविधा अनुभवा, असे पोस्टमध्ये म्हटले आहे. नवे आधार ॲप हे केवळ जुन्या ॲपचे अपडेटेड व्हर्जन नसून, आधार पडताळणी आणि माहिती शेअरिंगची पद्धतच बदलण्यात आली आहे. जुन्या ॲपमध्ये प्रमाणीकरणावेळी संपूर्ण आधार माहिती दिसत असे. मात्र, नव्या ॲपमध्ये फक्त आवश्यक माहितीच शेअर केली जाईल. त्यामुळे वैयक्तिक माहिती अधिक सुरक्षित राहणार आहे. नवीन ॲपमधील सर्वात महत्त्वाचे फीचर म्हणजे सुरक्षित क्यूआर आधारित आधार शेअरिंग. हॉटेल, रुग्णालये, सरकारी कार्यालये किंवा इतर सेवा केंद्रांवर आता संपूर्ण आधार क्रमांक दाखवण्याची गरज भासणार नाही. क्यूआर कोड स्कॅन करून आवश्यक माहितीच शेअर करता येणार आहे. याशिवाय, प्रमाणीकरण प्रक्रियेतही मोठा बदल करण्यात आला आहे. याआधी केवळ मोबाईलवर येणाऱ्या ओटीपी वर अवलंबून असलेली प्रणाली आता अधिक सुरक्षित करण्यात आली आहे. सोबत फेस अथेंटिकेशन आणि क्यूआर नोटिफीकेशन यांसारख्या अतिरिक्त सुरक्षा टप्प्यांचा वापर केला जाणार आहे.

---------

### महागाईचा उच्चांक

आणि डिझेलच्या दरात सुमारे ७.५ रुपयांची एकूण वाढ झाली आहे. या सततच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये महागाई आणि विविध क्षेत्रांतील वाहतूक खर्च वाढण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही काळापासून स्थिर असलेले इंधनाचे दर १५ मे रोजी प्रथमच पेट्रोल आणि डिझेलसाठी प्रत्येकी ३ रुपयांनी वाढवण्यात आले. त्यानंतर १९ मे रोजी ९० पैसे आणि २३ मे रोजी पेट्रोलमध्ये ८७ पैसे, तर डिझेलमध्ये ९१ पैशांची वाढ झाली. ताज्या वाढीनंतर दिल्लीत पेट्रोल ९९.५१ रुपयांवरून १०२.१२ रुपये, तर डिझेल ९२.४९ रुपयांवरून ९५.२० रुपये प्रतिलिटर झाले आहे. मुंबईत पेट्रोल १११.२१ रुपये आणि डिझेल ९७.८३ रुपयांवर पोहोचले आहे. कोलकात्यात पेट्रोल ११३.५१ रुपये आणि डिझेल ९९.८२ रुपये, तर चेन्नईत पेट्रोल १०७.७७ रुपये आणि डिझेल ९९.५५ रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे. राज्यांच्या स्थानिक करांमधील तफावतीमुळे इंधनाचे दर वेगवेगळ्या शहरांत वेगवेगळे आहेत. गेल्या दोन आठवड्यांत उष्णतेची लाट आणि पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने रोज लागणाऱ्या भाज्या प्रचंड महागल्या आहेत. अनेक भाज्या १५० रुपये किलोच्याही पुढे गेल्या आहेत. शहरात जिथे रोज ५५० ते ६५० ट्रक यायचे तिथे ३००–३५० ट्रक येत आहेत. भाज्यांची आवक घटली. फ्रेंच बिन्सचे दर १२० रुपयांवरून २५० रुपये किलोवर, टोमॅटो २५ वरून ५० रुपये किलोवर पोहचले आहेत. सूर्यफूल, सोयाबीन आणि पामतेलाचे दर १० ते १५ रुपयांनी लिटरमागे तडकले आहेत. जे ब्रॅण्ड १४० ते १४५ रुपये लिटरने मिळत ते किरकोळ बाजारात आता १६७ ते १८७ रुपये लिटरने घ्यावे लागत आहेत. १५किलोंचा कॅन जो २००० ते २५०० रुपयांना मिळत असे त्यासाठी आता ३००० ते ३५०० रुपये मोजावे लागत आहेत. चांगल्या कंपनीची तूरडाळ किरकोळ बाजारात १०० ते १३० रुपये किलोवर पोहोचली आहे. एपीएमसीतील ठोक दर मात्र १०० रुपये किलोचा आहे.

-------------

### शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण

दरवर्षी एप्रिल–मे महिन्यात करण्यात येतात. मात्र देशात जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा सुरु आहे. त्यामध्ये घरयादी तयार करणे व घरगणना हे काम १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. जनगणनेच्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येऊ नये असे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांना ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी लागणार आहे. त्यानुसार बदली संदर्भातील अधिनियमात मुदतवाढीबाबत सुधारणा करावी लागणार आहे. त्यानुसार या मुदतवाढीबाबतचा अध्यादेश राज्यपाल यांच्या मान्यतेने जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली.

----------

### सामान्यांचे कंबरडे मोडणार ; आता

माणसाचे कंबरडे मोडणार असल्याचे दिसत आहे. यावेळी बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं की, प्रत्येक आगारातून पाच लिटर डिझेल बचतीच्या सूचना प्रत्येक आगारांना सूचना दिल्या आहेत. जे आगार जास्त डिझेल बचत करेल त्यांना बक्षीस देण्यात येईल असंही त्यांनी यावेळी सांगितले आहे. देशात सातत्याने होत असलेल्या डिझेलच्या दरवाढीमुळे एसटी महामंडळावर आर्थिक संकट ओढवले आहे. महिन्याभरात दोनवेळा डिझेलचे दर वाढले असून, सध्या डिझेल ९१ रुपयांच्या पार गेले आहे. डिझेल प्रतिलिटर ३ रुपये १० पैशांनी महागल्यामुळे एसटी महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ ते १२५ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळ आधीच मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करत आहे. एकट्या एप्रिल २०२६ या एका महिन्यात महामंडळाला जवळपास ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. महागाई अशाच पद्धतीने वाढत राहिली, तर एसटी महामंडळ जगवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे अपरिहार्य ठरेल, असे संकेत प्रताप सरनाईकांनी दिले आहेत. मे महिन्यानंतर सरकारकडून मिळणाऱ्या मदतीचा आढावा घेऊन पुढील निर्णय ठरवला जाईल. एसटी बस प्रवासात महिलांना दिलेली ५०% सूट, दिव्यांगांना आणि समाजातील विविध घटकांना दिली जाणारी मोफत प्रवासाची सुविधा याचे पैसे राज्य शासनाकडून एसटी महामंडळाला नियमित मिळतात, अशी माहिती त्यांनी दिली. त्याचबरोबर एसटी महामंडळात येणाऱ्या काळात इलेक्ट्रिक बसेस वाढवण्यावर भर दिला जात असून, राज्यातील प्रमुख २०० ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर डिझेलचे दर असेच वाढत राहिले तर भाडेवाढ काही प्रमाणात करावी लागेल असे संकेत देखील मंत्री प्रताप सरनाईकांनी दिले आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या संभाव्य भाडेवाढी संदर्भात आणि आर्थिक तोटा टाळण्यासाठी मंत्रालयात एक अत्यंत महत्त्वाची बैठक बोलावली. या बैठकीला एसटी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी आणि पेट्रोलियम कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत. या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. गेल्या काही दिवसांत तब्बल ४ वेळा डिझेलच्या किमती वाढल्या आहेत, ज्यामुळे एसटी महामंडळावर आर्थिक संकट ओढवले आहे.डिझेलच्या या सततच्या दरवाढीमुळे एसटी महामंडळाचा वार्षिक खर्च तब्बल ३१० कोटी रुपयांनी वाढला आहे. पूर्वी डिझेलवर ३,३०० कोटी रुपये खर्च व्हायचे, जो आता वाढून सुमारे ३,६१० कोटी रुपयांवर गेला आहे, अशी माहिती देखील त्यांनी दिली आहे.

**जे बचत करील त्यांना प्रोत्साहन...**

एसटी महामंडळाला चार कंपन्यांकडून डिझेल पुरवठा होतो. १० लाख ८७ हजार लीटर डिझेल लागते. हा पुरवठा थांबू नये, काही ठिकाणी पुरवठा कमी आहे, म्हणून या कंपन्यांना सूचना व विनंती केली आहे. एसटी महामंडळ ५५ लाख प्रवाशांना सेवा देते. प्रति लीटर नुकसान होत असले तरी महामंडळाचे नुकसान होणार नाही अशी मागणी केली आहे. त्यांनीही सकारात्मक भूमिका घेतली आहे. प्रत्येक आगारातून ५ लीटर बचत करण्याचे आवाहन केले आहे. त्यातून रोज १ हजार लीटर डिझेल बचत होईल. तातडीच्या सूचना चालकांना देण्यासाठी आगार प्रमुखांना सूचना दिल्या आहेत. वाहन चालकांचे योग्य समुपदेशन करायला सांगितले आहे. तसेच बसेसची योग्य देखरेख करायला सांगितले आहे. बचत करणाऱ्या चालकांना प्रोत्साहन भत्ता व गौरव करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जे आगार अधिक बचत करतील, त्यांनाही प्रोत्साहित केले जाईल असेही ते म्हणाले.

-----------

### ८९ हजार कोटींच्या गुंतवणुकीला

आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कोल गॅसिफिकेशन ॲण्ड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्ह्ज, सोलर सेल मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसेच सिंथेटिक ग्रॅफाइट ॲनोड मटेरियल यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यकालीन उद्योग क्षेत्रांतील पाच प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. या सर्व प्रकल्पांमुळे राज्यात उच्च तंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे. या विशाल प्रकल्पांमुळे केवळ गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच वाढणार नाही, तर स्थानिक स्तरावर व्यावसायिक उपक्रम, पूरक उद्योग आणि पुरवठा साखळीही विकसित होणार आहे. तांत्रिक नवकल्पना, संशोधन व विकासाला चालना मिळून लघु व मध्यम उद्योगांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक युवकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

----------

### मॉन्सूनची वाटचाल

हवामान विभागाने म्हटले आहे. मराठवड्यातील छत्रपती संभाजीनर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी पुढील ३ दिवस वादळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. लातूर जिल्ह्यात पुढील ४ दिवस तर धाराशिव जिल्ह्यात ५ दिवस पावसाला पोषक हवामान आहे. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात पुढील ५ दिवस वादळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी पुढील ३ दिवस वादळी पावसाचा अंदाज आहे. तर त्यानंतर २ दिवस हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेसह काही भागात पावसाला पोषक हवामानाचा अंदाज आहे. विदर्भात पुढील ३ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

-----------

### सरकारी योजनांच्या गर्दीत

आहे. तब्बल ७७ हजार कोटींचा नफा पदरात पाडून घेतल्यानंतरही या कंपन्यांनी ग्राहकांना दिलासा देण्याऐवजी लागोपाठ चौथ्यांदा दरवाढ केली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे वाहतूक खर्च वाढून पर्यायाने भाजीपाला, दूध आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू महाग होत आहेत. असे असतानाही, या दरवाढीविरोधात पूर्वीसारखा तीव्र लोकक्षोभ किंवा आंदोलने रस्त्यावर दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या शांततेमागे सरकारची कल्याणकारी योजनांची खेळी अत्यंत प्रभावी ठरल्याचे बोलले जात आहे. लाडकी बहीण योजनेतून राज्यातील लाखो महिलांच्या बँक खात्यात दरमहा थेट पैसे जमा होत असल्याने कुटुंबांना तात्कालिक आर्थिक आधार मिळाला आहे. शेतकरी सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना वर्षाकाठी मिळणाऱ्या ठराविक निधीमुळे ग्रामीण भागातील रोष काहीसा शांत झाला आहे. मोफत अन्नधान्य यामधून गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना मोफत रेशन मिळत असल्याने खाद्यान्नाचा खर्च वाचला आहे. तज्ज्ञांच्या मते, थेट लाभ हस्तांतरण योजनांमुळे जनतेला तात्काळ पदरात काहीतरी पडल्याचे समाधान मिळते. मात्र, इंधन दरवाढीमुळे होणारे अदृश्य नुकसान लोकांच्या चटकन लक्षात येत नाही. तेल कंपन्यांचा ७७ हजार कोटींचा नफा हा थेट जनतेच्या खिशातील पैसा आहे. परंतु, मोफत अन्नधान्य आणि सन्मान निधीच्या गदारोळात हा मुख्य मुद्दा मुख्य प्रवाहातून बाजूला सारण्यात सरकारला यश आले आहे, असेच सध्याचे चित्र आहे. कारण एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने घ्यायचे अशीच सिस्टीम शासनाने राबवल्याचे दिसून येत आहे, कारण विविध अशा गोंडस योजना सुरू केल्यामुळे. ग्रहणींना पंधराशे रुपये लाडक्या बहिणीचे मिळतात, शेतकऱ्यांना केंद्राचे आणि राज्याचे असे मिळून चार हजार रुपये सन्मान योजना मिळते, स्वस्त धान्य दुकानावर मोफत अन्नधान्य मिळते, त्यामुळे या महागाईकडे फारसे लक्ष जात नसल्याचे एका पाहणीतून दिसून आले आहे. आता प्रश्न असा उपस्थित होतो की, निवडणुकीच्या तोंडावर सुरू असलेल्या या पॉप्युलिस्ट (लोकप्रिय) योजनांचा प्रभाव इंधन दरवाढीच्या चटक्यांपेक्षा मोठा ठरणार का? की येत्या काळात हा सुप्त असंतोष निवडणुकीच्या माध्यमातून बाहेर पडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात



### प.पु गुरुमाऊली यांचे आदेशाने दोन गावांत नदी स्वच्छता अभियान

माजलगाव । प्रतिनिधी

श्री.स्वामी समर्थ परम पूज्य गुरुमाऊली यांच्या कृपाशीर्वादाने माजलगाव व वडवणी या दोन्ही केंद्राच्या वतीने दि २६ मे मंगळवार रोजी गंगा दशहरा निमित्ताने नदी स्वच्छता अभियान व मानसन्मान सेवा तसेच अधिक मासा मुळे ७०० श्लोकाचे भागवत परायनचे वाचन करण्यात आले. पर्यावरण प्रकृती विभाग अंतर्गत गुरुपुत्र आबासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाने गंगा दशहरा निमित्त गोदावरी नदी स्वच्छता अभियान राबविण्यात माजलगाव,वडवणी व बीड जिल्हातील, जालना जिल्ह्यातील सेवेकरी बंधु व भगिनींनी सहभाग घेऊन सेवा केली. माजलगाव शाहुनगर केंद्राच्या माध्यमातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या साठी गावात जेष्ठ नागरिक व महिला भक्त उपस्थित होते.

### सावित्रीबाई आळणे यांचे दुःखद निधन

माजलगांव । प्रतिनिधी



तालुक्यातील आदर्श नगर, चिंचगव्हाण येथील रहिवासी सावित्रीबाई नंदकुमार आळणे यांचे दि.२६ मे मंगळवार रोजी पहाटे ४:०० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्षे होते. गेल्या दोन महिन्यांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून आळणे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यावर दि.२६ मे मंगळवार रोजी सायंकाळी ४:०० वाजता माजलगांव येथील मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या दत्तराज आळणे यांच्या मातोश्री होत. तसेच शिवसेनेचे माजी नगरसेवक अशोक आळणे यांच्या त्या चुलती होत.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कारावेळी राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, विधी क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ.सोळंके यांनी बौद्धांच्या जमिनी लाटल्या नाहीत -साळवे

माजलगांव । प्रतिनिधी

मौजे फुलेपिंपळगाव शिवारातील गट क्रमांक २० मधील गायरण जमीन ही बौद्ध समाजातील शेतकऱ्यांची असून, संबंधित शेतकरी अनेक वर्षांपासून ती जमीन कसून आपला उदरनिर्वाह करत असल्याची माहिती मनोज साळवे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सन २००५ ते २०१० या कालावधीत गट क्रमांक २० मधील ३३ शेतकऱ्यांपैकी केवळ दोन शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने जमीन विक्री केली होती. त्यानंतर आजपर्यंत कोणत्याही शेतकऱ्याने जमीन विक्री केलेली नसून शासनाकडून पुढील कोणत्याही विक्रीस परवानगी देण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.माझ्यासह गटातील कोणत्याही शेतकऱ्याची गायरण जमीन आमदार प्रकाश सोळंके यांनी खरेदी केलेली किंवा लाटलेली नाही, असा ठाम दावा मनोज साळवे यांनी केला आहे.सध्या काही राजकीय व्यक्तींमार्फत सोशल मीडियावर आमदार प्रकाश सोळंके यांनी कमी भावात जमीन विकत घेतल्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत.



# देवस्थान इनाम कायद्याविरोधात बीडमध्ये वारकरी दिंडी

## कायदा रद्द करण्याची जोरदार मागणी, महंतांची लक्षणीय उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६ या प्रस्तावित कायद्याविरोधात आज बीड शहरात सकल वारकरी समाज व मंदिर संरक्षण समितीच्या वतीने वारकरी, भाविक, श्रद्धाळू आणि हिंदू धर्मप्रेमींनी जोरदार आंदोलन छेडले. हिंदू धर्मातील पुरातन मंदिरे, देवस्थान, मठ, गड आणि संस्थानांच्या जमिनी संपुष्टात आणण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप करत हा प्रस्तावित कायदा तात्काळ रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी मंगळवारी (दि.२६) छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी भव्य वारकरी दिंडी काढण्यात आली. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.




देवस्थान इनाम जमिनी या केवळ मालमत्ता नसून त्या धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक व्यवस्थेचा आधारस्तंभ असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. देवस्थाने ही केवळ पूजा-अर्चेची ठिकाणे नसून धर्मप्रसार, संस्कृती संवर्धन, समाजजागृती आणि सामाजिक एकात्मतेची केंद्रे आहेत. प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थानांच्या मालमत्तेवर अतिक्रमण, अनाधिकृत हस्तांतरण आणि व्यापारीकरण वाढण्याची शक्यता असून भविष्यात प्रभावशाली पुढारी व धनदांडग्यांच्या ताब्यात या जमिनी जाण्याचा धोका असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात निघालेल्या दिंडीने शहराचे वातावरण भक्तिमय झाले होते. आंदोलनकर्त्यांनी देवस्थान जमीन वाचवा, हिंदू धर्मावरील अन्याय बंद करा अशा घोषणा देत शासनाचा निषेध नोंदविला.

महंतांची लक्षणीय उपस्थिती

या वारकरी दिंडीत महंत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकट स्वामी संस्थान, नेकनूर आळंदी पंढरपुरी), महंत ह.भ.प. संभाजी महाराज (उत्तराधिकारी, श्रीक्षेत्र नारायणगड), महंत ह.भ.प. तुकाराम महाराज भारती (बेलेश्वर संस्थान, बेलगाव), रामायणाचार्य ह.भ.प. नाना महाराज कदम, ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, ह.भ.प. त्रिंबक महाराज मातकर, ह.भ.प. रामेश्वर महाराज जाधव, ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह.भ.प. गोकुळ महाराज उबाळे आदी महंतांची लक्षणीय उपस्थिती होती.

तसेच या दिंडीत पांडुरंग महाराज शिंदे, लोखंडे महाराज, ओमतात्या खवतड, सिताराम महाराज, गजानन जोशी, मुकुंदराव खडकीकर, रविंद्र कुलकर्णी, शरद कुलकर्णी, प्रणव राखे, स्वामी महाराज हातळे, श्रीकृष्ण खोसे, महेश मुळीक, जनार्दन महाराज ढेरे, विष्णु घोलप, सुंदर नांगरे, रामहरी घोडके, लग्न महाराज गाडे, अक्षय महाराज मस्के, शरद घोलप, सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे, रामनाथ खोड, शेख युनुस, बाजीराव ढाकणे, राजेंद्र आमटे, संजय शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी, हिंदूप्रेमी, श्रद्धाळू आणि भाविक सहभागी झाले होते.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६ हा प्रस्तावित कायदा तात्काळ मागे घ्यावा, पुरातन मंदिरे, देवस्थान, मठ, गड आणि संस्थानांच्या जमिनींचे संरक्षण करावे, देवस्थान जमिनींचे डिजिटल अभिलेखीकरण करण्यात यावे, तसेच इनामी आणि देवस्थान जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच देवस्थानांच्या पारदर्शक व्यवस्थापनासाठी आणि उत्पन्नवाढीसाठी स्वतंत्र धोरण राबवावे, देवस्थान जमिनींसंदर्भात कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भाविक, विश्वस्त आणि पुजारी यांची सुनावणी घ्यावी, अशाही मागण्या आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केल्या.

# जायकवाडी प्रकल्पातून पाणी सोडण्यासाठी आ.सोळंके यांचे मंत्री विखे पाटील यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

जायकवाडी प्रकल्प - पैठण धरणाच्या मुळ प्रकल्पीय मंजुर पाणी वापर सन १९८५ नुसार माजलगाव धरणास पाणी सोडणे यासाठी ५६०.०० द.ल.घ.मी. पाण्याची तरतुद करण्यात आली होती.संदर्भीय क्रं. २ च्या शासन निर्णयानुसार ५६०.०० द.ल.घ.मी.ऐवजी २९९.४२ द.ल.घ.मी.पाणी वापर मंजुर करण्यात आले आहे.जायकवाडी प्रकल्पाचा उजवा कालवा १३२ कि.मी.लांबीचा असुन हा कालवा पुर्ण झाल्यापासुन माजलगाव धरणात पुर्ण क्षमतेने (२२०० क्ससेस) ने पाणी सोडले जात नव्हते.कॅनाल नादुरूस्ती मुळे पाणी वाया जात होते.त्यामुळे आजपर्यंत जायकवाडी प्रकल्पातून माजलगाव धरणात जास्तीत जास्त १०२.५ द.ल.घ.मी. पाणी सोडण्यात आल्याचे विभागाच्या आकडेवारी वरून सिध्द होते. त्यामुळे माजलगाव धरणावर अवलंबुन असलेले सिंचनक्षेत्र पूर्णपणे साध्य होत नाही.मागील वर्षी जा.प्र.उजव्या कालव्याची दुरूस्ती साठी शासनाने ५६० कोटी रु.ची योजना मंजुर करून काम पुर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे २२५० क्युसेस क्षमता पुर्नस्थापीत झाली असताना व जायकवाडी प्रकल्पात पाणी उपलब्ध असताना देखील माजलगाव धरणात पाणी सोडले नाही. या विषयाला अनुसरून दि २६ मे मंगळवार रोजी जलसंपदा मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांची आ.प्रकाश सोळंके यांनी भेट घेऊन खालील मागण्या केल्या आहेत.त्या पुढील प्रमाणे जायकवाडी प्रकल्पच्या मुळ प्रकल्पीय मंजुर वापर - १९८५ नुसार दरवर्षी जायकवाडी प्रकल्पातुन ५६० द.ल.घ.मी.पाणी माजलगाव धरणात सोडण्यात यावे व तशा प्रकारे पाणी वाटपाचे फेर नियोजन करावे, पश्चिमी वाहीनी नद्याचे पाणी अंदाजे ८५ टीएमसी गोदावरी खोऱ्यात सोडण्याची योजना शासनाने घोषीत केली आहे व या योजनेचा डीपीआर करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या योजनेद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या नियोजनामध्ये जायकवाडी प्रकल्पातून माजलगाव धरणात पाणी सोडण्याचे फेर नियोजन करावे,पश्चिमी वाहिन्याचे उपलब्ध होणारे ८५ टीएमसी पाणी वळवल्या नंतर गोदावरी खोऱ्यात नवीन प्रकल्प हाती घेण्यासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणात उपलब्धता होणार आहे.भविष्यात हे पाणी उपलब्ध होणार असल्याने,नवीन प्रकल्पासाठी पाणी उपलब्धता करून नवीन प्रकल्पाचे बांधकाम हाती घ्यावे.तरी वरील मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, ही विनंती आ.प्रकाश सोळंके यांनी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.



## पान ६ वरुन...

### दारू दुकानात

खात्रीशीर माहितीच्या आधारे पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने बालेपीर परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. पोलीस चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, पुढील तपासासाठी त्याला उपविभागीय पोलीस अधिकारी बीड यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### न.प.बीडमधील गणेश पगारे

सहा-लेखापाल नगर परिषद बीड यांच्या विरोधात स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून सखोल तपास करण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली होती. मात्र, इतका कालावधी उलटूनही कोणतीही चौकशी अथवा कार्यवाही न झाल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाच्या या भूमिकेविरोधात आता आंदोलनाचा पवित्रा घेत दि. २८ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड समोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. पूर्वी हे उपोषण दि. २६ मे रोजी होणार होते; मात्र काही तांत्रिक कारणांमुळे आंदोलनाची तारीख बदलून २८ मे करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. भ्रष्टाचार प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही सामाजिक कार्यकर्ते अक्षय कोकाटे यांनी दिला आहे

### केजमध्ये अवकाळी पाऊस

सौ संगीता ताई ठोंबरे ,शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैया मुळूक, श्री पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख, श्री दादासाहेब ससाने विधानसभा प्रमुख, श्री दत्तकुमार काकडे युवा सेना तालुकाप्रमुख, श्री महेंद्र चाटे तालुका उपप्रमुख, विकास काशीद तालुका सचिव, आकाश चाळक युवा सेना शहर प्रमुख ,प्रकाश गुंड ज्येष्ठ शिवसैनिक, आदित्य राजनकर शेतकरी सेना तालुकाप्रमुख, योगेश देशमुख उपतालुकाप्रमुख, शिवशंकर नाईकनवरे शिवसैनिक, ज्ञानेश्वर भांगे युवा सेना उप तालुकाप्रमुख, विश्वासराव जाधव तालुका संघटक, शिवाजी गायकवाड युवा सेना उपतालुकाप्रमुख, संतोष बुडूक ज्येष्ठ शिवसैनिक ,अशोक जोगदंड ज्येष्ठ शिवसैनिक,अजय तांबे ,शुभम गंभीरे, पृथ्वीराज इंगळे, आदेश देशमुख, स्वप्निल पवार, विलास घुले, उमेश माने, बापू गालफाडे, आसिफ शेख, श्रीराम कदम, बब्रुवान इंगळे, महादेव कदम, अजय तांबे,

### नगराध्यक्षांनी 'त्या' आजीला

जागा देण्याचा शब्द संबंधित महिलेला दिला. आज्जी तुम्ही काळजी करू नका, तुमचे कसलेही नुकसान होणार नाही. नवी भाजी मंडईतच तुम्हाला योग्य ठिकाणी जागा उपलब्ध करून देते असे नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी सांगितले. भविष्यात तुम्हाला त्रास होणार नाही, मी तुमच्या सोबत असेल असाही शब्द यावेळी त्यांनी दिला.

### महागाई, बेरोजगारी व

कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय, पेपरफुटी प्रकरणातील सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी, बीड जिल्ह्यातील शिक्षणाचे बाजारीकरण करणाऱ्या खासगी क्लासेसचे ऑडिट करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली.तलवाडा पोलीस स्टेशन येथे व - कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपीस तात्काळ अटक करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनात युवा जिल्हाध्यक्ष सुंदर वाघमारे, जिल्हा सरचिटणीस प्रतीक वाघमारे, जिल्हा प्रवक्ता निलेश वाघमारे, शहराध्यक्ष राजेश वडमारे, शहर संघटक आनंद डोंगरे, युवा शहराध्यक्ष विकास शिंदे, भीमराव कुठे, कोंडीबा लांडगे, शशिकला लांडगे, वैष्णवी लांडगे, प्रेमकुमार कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी नितीन सोनवणे यांनी प्रशासनाने नागरिकांच्या प्रश्नांवर तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला.

### स्थानिक स्वराज्य

निवासी उपजिल्हाधिकारी धाराशिव / लातूर / बीड यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. तसेच उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची प्रारूप मतदान केंद्र यादीही संबंधित कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

### कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या

अधिकारी व मार्गदर्शकांची व्याख्याने मांगवाड्यांमध्ये आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम केले. समाजातील प्रत्येक लेकरू शिकले पाहिजे, अधिकारी झाले पाहिजे आणि समाजाची प्रतिष्ठा वाढवली पाहिजे, हा यात्रेमागील मुख्य विचार असल्याचे त्यांनी सांगितले.या यात्रेमुळे मातंग समाजात निश्चितच शैक्षणिक जागृती निर्माण होईल आणि भविष्यात समाजातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वळतील, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या शिक्षण संवाद यात्रेसाठी ड. स. स. कसबे, विक्रम वाघमारे, विशाल गवळी, शंकर आलाट, केतन लोखंडे, महाराज थोरात, विकास जाधव, अभिषेक हातागळे, अशोक जाधव, करण भिसे, विजय शेरकर, प्रदीप दळवी, संदीप भिसे आणि कृष्णा कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या समारोप कार्यक्रमाला विक्रम वाघमारे , रणजीत पाटोळे ,विशाल गवळी अभिषेक हातागळे , मच्छिंद्र उपाडे, अक्षय गवळी , विकास जाधव ,कैलास गायकवाड विजय शेरकर सह कार्यकर्ते उपस्थित होते .

# श्रावस्ती बौद्ध विहार व जगदंबा देवी मंदिर पिंपरवाडा येथील विकास कामांसाठीचा प्रलंबित निधी तातडीने वितरीत करावा -आ. सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

प्रादेशिक विकास योजनेअंतर्गत मंजूर होऊन पूर्ण झालेल्या पर्यटन विकास कामांसाठी प्रलंबित निधी उपलब्ध करून देण्याबाबत दि २६ मे मंगळवार रोजी पर्यटन मंत्री ना. शंभूराजे देसाई यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



यामध्ये श्रावस्ती नगर बौद्ध विहार, केसापुरी ता. माजलगाव जि. बीड येथील पर्यटन विकास कामांसाठी १५० लक्ष रुपयांच्या कामास दि.०२ ऑगस्ट २०२४ रोजी शासन मान्यता प्राप्त झाली आहे. सदर काम पूर्ण झाले असून आतापर्यंत ३२ लक्ष रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे.उर्वरित ११८ लक्ष रुपये निधी अद्याप प्रलंबित आहे,जगदंबा देवी मंदिर,पिंपरवाडा (आईचा तांडा) ता. धारूर जि. बीड येथील पर्यटन क्षेत्र विकास कामांसाठी २५० लक्ष रुपयांच्या कामास दि.०२ ऑगस्ट २०२४ रोजी शासन मान्यता प्राप्त झाली आहे.सदर काम पूर्ण झाले असून आतापर्यंत ६६ लक्ष रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित १८४ लक्ष रुपये निधी प्रलंबित आहे.पर्यटन विकासाला गती मिळावी यासाठी आवश्यक प्रलंबित निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती मंत्री शंभुराजे देसाई यांच्याकडे आ.प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

# गायीला 'राष्ट्रीय पशू' घोषित करा; पाटोद्यातील मुस्लिम बांधवांचे मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

भारतामध्ये गायीला असलेले प्राचीन धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व विचारात घेऊन, तसेच देशातील कोट्यवधी जनतेच्या भावनांचा आदर करत गायीला 'राष्ट्रीय पशू' म्हणून घोषित करण्यात यावे, अशी मागणी पाटोदा तालुक्यातील मुस्लिम बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील एक सविस्तर मागणीचे निवेदन पाटोदा तहसील कार्यालयामार्फत राज्याचे मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आले.ग्रामीण अर्थव्यवस्थेत गायीचे मोठे योगदाननिवेदनात नमूद केल्यानुसार, भारत देशात गायीला प्राचीन काळापासून विशेष स्थान आहे. अनेक नागरिक गायीला पूजनीय मानतात. त्याचबरोबर शेती, दुग्धव्यवसाय आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत ठेवण्यात गायीचे अत्यंत मोठे योगदान आहे. त्यामुळे गोसंवर्धनाला अधिक बळ मिळणे गरजेचे आहे. लोकभावनेचा आदर करण्याची मागणीसध्या भारताचा राष्ट्रीय पशू म्हणून वाघाला मान्यता आहे. मात्र, देशातील मोठी लोकभावना, सांस्कृतिक परंपरा आणि गोवंश रक्षणाच्या दृष्टीने आता गायीला राष्ट्रीय पशू म्हणून घोषित करावे, अशी मागणी अनेक स्तरामधून सातत्याने होत आहे. याच पार्श्वभूमीवर पाटोद्यातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येत या विषयाच्या गांभीर्याने विचार करून शासनाने तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.पाटोद्यातील नागरिकांची उपस्थितीया निवेदनावर पाटोदा तालुक्यातील प्रमुख मुस्लिम बांधव व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यामध्ये शे. इम्रान नुर, युसुफ खान, शेख उस्मान, शेख बाबु, शेख अफान, सय्यद जनेमिया, शेख हमीद, शेख समीर, शेख अनिस, शेख रउफ, राहुल चव्हाण, रामीज मदारी, अमजद पठाण, समीर अहमद, गणेश कवडे, मुकुंद शिंदे आकाश कांकरिया आदी प्रमुखांसह अनेक नागरिकांनी आपल्या स्वाक्षऱ्या करून या मागणीला जाहीर पाठिंबा दिला आहे.

# पाटोदा तालुक्यात नरेगात भ्रष्टाचाराचा धुमाकूळ!

## उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाला कुसळंबच्या ग्रामसेवक व बीडीओ यांनी दाखवली 'केराची टोपली'

पाटोदा । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी दलित वस्तीतील रोजगार हमी योजनेंतर्गत (छठएऋ-) २०२२ ते २०२५ या कालावधीत झालेल्या कथित बोगस कामांची माहिती मागितल्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी गट विकास अधिकारी (इऊज) व ग्रामसेवक यांना तात्काळ माहिती व कारवाई सादर करण्याचे आदेश दिले होते. ते पण सात दिवसाच्या आत मात्र या आदेशाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत संबंधित अधिकारी लपवाछपवी करत असल्याचा गंभीर आरोप बाळासाहेब गायकवाड यांनी केला आहे.

बाळासाहेब गायकवाड म्हणाले, सतत आंदोलन करून उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून आदेश मिळवूनही ग्रामसेवक व इऊज यांनी कोणाच्या अभयावरून आदेश धुडकावून लावला आहे? भ्रष्टाचार करणाऱ्यांना कोण पाठीशी घालत आहे? हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

मुख्य आरोप

दलित वस्तीतील अनेक कामे पूर्णपणे बोगस दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला गेला.

रस्ते, जीएसबी शेतकऱ्यांच्या बांधावरचा मुरूम , उपकरा उकरी करून 'थातूर मथूर' काम दाखवून एका रस्त्याचे २० ते २२ लाख रुपयांचे बिल काढले जाते, मात्र प्रत्यक्षात केवळ १ ते २ लाख रुपये खर्च करून उरलेला पैसा लुटला जात असल्याची जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा आहे.

रोजगार हमी योजनेत एकही माणूस प्रत्यक्ष कामावर नसताना त्यांच्या नावे बिल काढले जात आहेत.

२०२२ ते २०२६ या कालावधीत अशा अनेक बोगस कामांचा आकडा मोठा असल्याचा दावा.

बाळासाहेब गायकवाड यांनी पुढे म्हटले, उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे आदेश असतानाही आजही बोगस कामे सुरूच आहेत. ही खोटी कामे कोणाच्या आश्रयाने चालत आहेत, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करावी.

बाळासाहेब गायकवाड यांनी प्रशासनावर तीव्र शब्दांत टीका करताना म्हटले, आदेश देऊनही ग्रामसेवक व इऊज लपत असतील तर सामान्य जनतेला न्याय कसा मिळणार? भ्रष्टाचारी एवढे माजले असतील तर हा काळ भयानक आहे. राजकीय पाठबळामुळे हे भ्रष्टाचार चालू आहेत का? जिल्हाधिकाऱ्यांनी यावर तात्काळ कारवाई करावी. ते पुढे म्हणाले, जर यावर लवकरात लवकर कारवाई झाली नाही तर ग्रामपंचायत व पंचायत समितीवर टाळे ठोकून आंदोलन करण्यात येईल. या प्रकरणामुळे पाटोदा तालुक्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी कोणताही अधिकारी, खासदार, आमदार किंवा मंत्री समोर येत नाही. प्रशासनातील अधिकारी लाचारासारखे वागत असतील तर भ्रष्टाचार कसा थांबणार? असे प्रश्न जनतेकडून विचारले जात आहेत. वंचित बहुजन आघाडीने वरिष्ठ प्रशासनाकडे आज रोजीचे कुसळंब ग्रामपंचायत अंतर्गतचे रोजगार हमीचे कामे तात्काळ चौकशी व सर्व बोगस कामे थांबवण्याची मागणी देखील केली आहे.

# जमिनीच्या सातबाऱ्यासारखा आता पाण्याचाही सातबारा निघणार


## बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली बैठक: असा उपक्रम राबविणारे महाराष्ट्र देशातील पहिलेच राज्य

मुंबई : आपल्या गावात जमीन किती, तिची मालकी कोणाची हे सातबारा उताऱ्यावरून लगेच कळते. त्याच धर्तीवर आता 'पाण्याचा सातबारा' ही नावीन्यपूर्ण संकल्पना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य असेल. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात मंगळवारी झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला. पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जलव्यवस्थापन करण्यासाठी ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. प्रत्येक गाव आणि त्याच्या परिसरात पडणारा पाऊस, या पावसाची साठवणूक किती प्रमाणात होते, त्याचा फायदा प्रत्यक्षात किती होतो, पाण्याचा पुनर्वापर किती केला जातो या सगळ्या बाबींची नोंद 'जलसातबारा'मध्ये केली जाणार आहे. त्यामुळे पाण्याचे महत्तम नियोजन करता येणार आहे. जलव्यवस्थापन करणाऱ्या 'अक्केरियम' या संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची



संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. एकीकडे राज्यात तीव्र पाणीटंचाई जाणवत असल्याने राज्य शासनाचा हा निर्णय भविष्यात महत्त्वाचा ठरणार आहे. एकदा पाण्याचे ऑडिट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाते. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्केरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे 'वॉटर अकाउंटिंग फ्रेमवर्क' आणि 'वॉटर बॅलन्सशीट'ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. मंत्रालयात झालेल्या बैठकीला पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पलकुंडवार, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर आदी उपस्थित होते.

## दुधिया मालदा आंब्याची विशेषत:



आंबा हा 'फळांचा राजा' आहे हे आपल्या सर्वांना माहीतच आहे. त्यातच हापूस आंबा म्हटले की 'देशाची शान' असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. पण भारतात हापूस व्यतिरिक्त आंब्याच्या प्रजाती आहेत ज्या त्यांच्या चवीमुळे आणि वेगळेपणा मुळे प्रसिद्ध आहे. अशाच एका आंब्याच्या प्रजातीचे नाव आहे 'दुधिया मालदा'. गंगेच्या पाण्यातून मिळालेला अमृतसर असे या आंब्याचे वर्णन करण्यात येते. बिहारमधील पाटण्यातील या आंब्याची चव आणि गोडवा इतकी अप्रतिम आहे की एकदा या आंब्याची चव घेणारा या आंब्याला विसरू शकत नाही असे म्हणतात. दुधिया मालदा आंबा आतून मऊ आणि रसाळ आणि अप्रतिम गोडवा असलेला आहे. या आंब्याचा गर मऊ आणि दुधासारखा असतो. त्यामुळेच याला 'दुधिया मालदा' असे नाव मिळाले आहे. या आंब्याची साल पातळ आणि हलकी असते. त्यामुळे तो खाण्यास खूप सोयीस्कर असतो. दुधिया मालदा आंब्याचा सुगंध इतर आंब्यांपेक्षा वेगळा आणि आकर्षक असतो. दुधिया मालदा आंब्याची सर्वात अनोखी गोष्ट म्हणजे त्याला दुधातून सिंचन केले जाते.

'दुधिया मालदा' आंब्याचा इतिहास : लखनऊचे नवाब फिदा हुसेन यांना दूध आणि आंब्याची खूप आवड होती. त्यांनी पाटण्यातील दिघा येथे दुधाचे सिंचन केलेले आंब्याचे रोप लावले होते. या आंब्याला ते दुधाने सिंचन करत होते. यातून अनेक दिवसांनी 'दुधिया मालदा' नावाची अद्भुत प्रजाती तयार झाली.

दुधिया मालदा आंब्याची लोकप्रियता : दुधिया मालदा आंबा आजही तितकाच लोकप्रिय आहे.

गेल्या वर्षी ३३ देशांमध्ये हे आंबे निर्यात करण्यात आले होते. अमेरिका, इंग्लंड, जपान, दुबई अशा अनेक देशांमध्ये हा आंबा आवडीने खाल्ला जातो. विदेशातून दरवर्षी या आंब्याची ऑर्डर येते. हा आंबा जून मध्ये पिकतो आणि १०० रुपये किलो दराने विकला जातो.

## पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव आणि एकात्मिक नियंत्रण उपाय

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते. जाणून घेऊ या सुत्रकृमी रोगाची सुरुवातीची लक्षणे व त्यावर करायचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

प्रसाराची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांचेमार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो

सुत्रकृमीच्या गाठी कशा ओळखायच्या? : सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.

पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळ्या वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.

सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी. जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

## हळदीची सुधारित पद्धतीने लागवड करा अन् मिळवा भरघोस उत्पादन

खरीप हंगामात इतर पिकांसोबत शेतकरी हळद लागवड करतात. चांगल्या जातीची निवड आणि आधुनिक लागवड पद्धती यामुळे हळद पिकाचे चांगले उत्पादन मिळते.

हळद लागवड कालावधी : हळदीची पेरणी १५ मे ते जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करता येते. सिंचनाची सोय असल्यास अनेक शेतकरी एप्रिल-मे महिन्यातही पेरणी करतात.

जमीन आणि हवामान : हळदीसाठी वालुकामय व चिकणमाती जमीन उत्तम आहे. हळद लागवड करण्यापूर्वी जमिनीचा चांगला निचरा झाला असल्याची खात्री करा. पाणी साचलेल्या जमिनीत हळद नीट वाढू शकत नाही. हळदीची लागवड उष्ण व दमट हवामान असलेल्या भागात केली जाते. या पिकाच्या वाढीसाठी इतर पिकांपेक्षा जास्त खतांची आवश्यकता असते.

हळदीच्या सुधारित जाती : आर एच ५, राजेंद्र सोनिया, पालम पितांबर, सोनिया, सुगंध, सूरमा, सुदर्शन, सगुणा, रोमा, कोईम्बतूर, कृष्णा, आर. ९/९०, - १३/९०, पालम लालिमा, १८, १, पंत इत्यादी हळदीच्या सुधारित जाती आहेत.

हळद लागवडीसाठी चांगले उत्पादन देणाऱ्या सुधारित जातींची निवड महत्त्वाची ठरते. या सर्व जाती २०० ते २५० दिवसांत तयार होतात.

लागवड पद्धती : १) सरी वरंबा पद्धत - हळद पिकास पाट पाणी पद्धतीने सिंचन करावयाचे असल्यास ही पद्धती फायदेशीर ठरते. २) रुंद वरंबा पद्धत- ठिबक सिंचन पद्धती उपलब्ध असल्यास रुंद वरंबा पद्धतीने लागवड करावी. या पद्धतीने लागवड केल्यास गड्डे चांगले पोसतात. परिणामी उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. रुंद वरंबा पद्धतीने हळद लागवड केल्यास वरब्यांवर पडणाऱ्या जास्तीच्या पाण्याचा निचरा होण्यास मदत होते. परिणामी कंदकूज रोगापासून हळद पिकाचे संरक्षण होते.



बेणे निवड : एक हेक्टर लागवडीसाठी २५ क्विंटल जेठे गड्डे (त्रिकोणाकृती मातृकंद) बियाणे आवश्यक असते. साधारण ५० ग्रॅमपेक्षा अधिक वजनाचे सशक्त, रसरशीत तसेच नुकतीच सुप्तावस्था संपवून थोडेसे कोंब आलेले असावेत. गड्डे स्वच्छ करून त्यावरील मुळ्या काढून घ्याव्यात. कुजलेले, अर्धवट सडलेले बियाणे लागवडीसाठी वापरू नये. जेठे गड्डे उपलब्ध होत नसतील तर बगल गड्डे (४०-५० ग्रॅम) किंवा हळकुंडे (३० ग्रॅमपेक्षा जास्त वजनाचे) बेणे म्हणून वापरावे. निवडलेली हळकुंडे ठळक, लांब, जाड, ठसठशीत वाढलेली, निरोगी आणि एकसमान आकाराचे भेसळमुक्त असावेत.बेणे प्रक्रिया : रासायनिक बेणे प्रक्रिया - क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि अधिक कार्बेन्डाझिम (५० टक्के पाण्यात मिसळणारे) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात निवडलेले गड्डे १५ ते २० मिनिटे बुडवावेत. नंतर बेणे सावलीत सुकवावे.

जैविक बेणे प्रक्रिया - ॲझोस्पिरीलम १० ग्रॅम अधिक स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (पीएसबी) १० ग्रॅम आणि व्हॅम २५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. द्रावणात बेणे १० ते १५ मिनिटे बुडवून लगेच लागवडीसाठी वापरावे. अगोदर रासायनिक बेणे प्रक्रिया करून बियाणे सावलीमध्ये दोन ते तीन दिवस सुकवावे. त्यानंतर लागवडीपूर्वी जैविक बीजप्रक्रिया करावी.

खत व्यवस्थापन : सेंद्रिय खताचा जास्तीत जास्त वापर केल्यास उत्पादनवाढीस फायदा होतो. पूर्व मशागतीच्या वेळी हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. माती परीक्षणानुसार हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश द्यावे. लागवडीच्या वेळी स्फुरद आणि पालाशची संपूर्ण मात्रा द्यावा. नत्र २ हप्त्यांत विभागून द्यावे. नत्राचा पहिला हप्ता लागवडीनंतर ४५ दिवसांनी, तर दुसरा हप्ता भरणीच्या वेळी (लागवडीनंतर १०५ दिवसांनी) द्यावा. तसेच भरणीच्या वेळी हेक्टरी दोन टन निंबोळी किंवा करंज पेंडीचा वापर करावा.

पाणी व्यवस्थापन : रेताड जमिनीमध्ये तुषार किंवा ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबकच्या दोन लॅटरलमधील अंतर ४ ते ५ फूट ठेवावे. जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. सतत ओलावा राहिल्याने हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. लागवड एप्रिल-मे महिन्यात होत असल्याने सुरवातीच्या काळात पाऊस पडेपर्यंत पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. कारण मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा हा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. जमिनीप्रमाणे हा कालावधी कमी-जास्त ठेवावा. पावसाळा सुरू झाल्यानंतर पावसाचे पाणी जमिनीमध्ये साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यांनंतर हिवाळ्यामध्ये पाण्याच्या दोन पाळीमधील अंतर १२ ते १५ दिवस ठेवावे. मात्र पीक काढणीच्या १५ दिवस अगोदर अजिबात पाणी देऊ नये. पाऊस समाधानकारक असेल तर हलक्या ते मध्यम प्रतिच्या जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात.




### महत्वाच्या घटना

१९५३ : माल्कम चौथा स्कॉटलंडच्या राजेपदी
१३२८ : फिलिप सहावा फ्रांसच्या राजेपदी
१७०३ : झार पीटर द ग्रेटने सेंट पीटर्सबर्ग शहराची स्थापना केली
१८१२ : ला कोरोनियाची लढाई.
१८१३ : १८१२चे युद्ध अमेरिकेच्या सैन्याने फोर्ट जॉर्ज किल्ला जिंकला.
१८८३ : अलेक्झांडर तिसरा, रशियाच्या झारपदी.
१८९६ : अमेरिकेच्या सेंट लुईस शहरात एफ.४ टोर्नेडो. २५५ ठार.
१९०५ : त्सुशिमाची लढाई.
१९०६ : महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना.
१९०७ : सान फ्रांसिस्को मध्ये प्लेगचा प्रादुर्भाव.
१९२७ : फोर्ड मोटर कंपनीने मॉडेल टी कारचे उत्पादन बंद केले व मॉडेल ए तयार करणे सुरू केले.
१९३० : त्याकाळी सर्वात उंच (३१९ मीटर १०४६ फूट) असलेल्या ख्रायसलर सेंटर या इमारतीचे न्यूयॉर्कमधे उद्घाटन झाले.
१९४१ : दुसरे महायुद्ध अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट यांनी देशात आणीबाणी जाहीर केली.
१९५१ : मुंबई येथे तारापोरवाला मत्स्यालय सुरू झाले.
१९६४ : गुलजारीलाल नंदा यांनी भारताचे हंगामी पंतप्रधान म्हणून कार्यभार स्वीकारला.
१९९४ : नोबेल साहित्य पुरस्कार विजेते रशियन लेखक अलेक्झांडर सॉल्केनिटसेन पाश्चिमात्य देशातील वीस वर्षांचा आपला वनवास संपवून आपल्या देशांत परतले.
१९९८ : ग्रँड प्रिन्सेस या जगातल्या (त्याकाळच्या) सर्वात मोठ्या व सर्वात महागड्या जहाजाने आपल्या पहिल्या सफरीला सुरुवात केली.
१९९९ : आंतरराष्ट्रीय न्यायालयाने हेग येथे स्लोबोदान मिलोसेविचवर कोसोवो मध्ये माणुसकीविरुद्ध अत्याचारांबद्दल गुन्हा दाखल केला.
२००२ : नेपाल चे तत्कालीन पंतप्रधान देऊबा यांना तीन वर्षाकरिता पक्षातून बाहेर काढण्यात आलं.
२००६ : जावाच्या योग्यकर्ता शहरात भूकंप. ६,६०० ठार.
२००८ : भारत सरकारने सिमेंटच्या निर्यातीवर लावलेला प्रतिबंध मागे घेतला.
२०१० : भारतातील ओडिसा राज्याच्या बालासोर जिल्ह्यातील चांदीपूर या ठिकाणी अणु तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या धनुष आणि पृथ्वी २ क्षेपणास्त्रांची भारतीय लष्करी दलाने यशस्वी चाचणी केली.
२०१६ : हिरोशिमा पीस मेमोरियल पार्क आणि हिबाकुशाला भेट देणारे बराक ओबामा अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती आहेत.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३२ : डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे, कादंबरीकार, कवी, मर्मग्राही समीक्षक
१९१३ : चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचा जन्म. (मृत्यू: ११ मे २००४)
१९२३ : अमेरिकेचे ५६ वे राष्ट्राध्यक्ष व नोबेल पारितोषिक विजेते हेन्री किसिंजर यांचा जन्म.
१९३१ : पद्मश्री, पद्मविभूषण तसचं, संगीत क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार आणि उत्कृष्ट साहित्य क्षेत्रांतील सर्वोच्च पुरस्कार ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट भारतीय लेखक, कवी, नाटककार, अनुवादक, आणि गीतकार डॉ. ओट्टाप्लाक्कल नीलकंदन वेलु कुरुप यांचा जन्मदिन.
१९३६ : भारतीय धावपटू आणि पत्रकार रणजीत भाटीया यांचा जन्मदिन.
१९३८ : कादंबरीकार डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे यांचा जन्म.
१९५७ : भारतीय वकील आणि राजकारणी नितीन गडकरी यांचा जन्म.
१९६२ : भारतीय क्रिकेटर रवी शास्त्री यांचा जन्म.
१९६३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय अमेरिकन व्यवसायिक तसचं, अ‍ॅडोब इंक चे माजी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शंतनू नारायण यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१० : नोबेल पारितोषिक मिळालेले जर्मन डॉक्टर रॉबर्ट कोच यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १८४३)
१९१९ : भारतीय लेखक कंधुकुरी वीरसासिंगम यांचे निधन. (जन्म: १६ एप्रिल १८४८)
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाबाई भीमराव आंबेडकर यांचे निधन.
१९६४ : पंडित जवाहरलाल नेहरू, भारताचे पहिले पंतप्रधान.
१९८३ : भारतीय राजकारणी व माजी लोकसभा अध्यक्ष तसचं, राजस्थान राज्याचे माजी राज्यपाल सरदार हुकम सिंह यांचे निधन.
१९८६ : प्रा. अरविंद मंगरुळकर, संगीत समीक्षक आणि संस्कृतचे अभ्यासक.
१९८६ : भारतीय राजकारणी, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री अजय मुखर्जी निधन. (जन्म: १५ एप्रिल १९०१)
१९९४ : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्रातील थोर विचारवंत, संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे मुख्य संपादक.
१९९८ : अर्थतज्ञ मिनोचर रुस्तुम तथा मिनू मसानी यांचे निधन. (जन्म: २० नोव्हेंबर १९०५)
२००७ : हॉट एअर बलून चे निर्माते एड यॉस्ट यांचे निधन. (जन्म: ३० जून १९१९)
२००८ : ऑस्कर पुरस्कार विजेते अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक, निर्माता आणि अभिनेता सिडनी इर्विन पोलॅक यांचे निधन.
२०१६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित धाडसी भारतीय लष्कर सैन्याच्या आसाम रेजिमेंटचे शिपाई हवालदार हंगपन दादा यांचे निधन.

# प्रशिक्षण शिबिरातील विचार बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांनी पोहचवा-ना. विखे

अहिल्यानगर/शिर्डी । प्रतिनिधी

भाजपा कार्यकर्त्यांसाठी अंत्योदयाचा मंत्र हा आत्मा तर प्रशिक्षण पुस्तिका ही गीता असून प्रशिक्षण शिबिरातील विचार बूथ स्तरापर्यंत व शेवटच्या कार्यकर्त्यां पर्यंत पोहचवले तर प्रशिक्षणचा उद्देश सफल होईल अशी भावना जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली. शिर्डी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान २०२६ च्या समारोप प्रसंगी ना. विखे पाटील बोलत होते. यावेळी आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी आ.स्नेहलता कोल्हे, प्रदेश कार्यालयीन प्रभारी रवीजी अनासपुरे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अनिल मोहिते, राजेंद्र गोंदकर उपस्थित होते. ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, या प्रशिक्षण शिबिराला वैचारिक अधिष्ठान होते. पक्षाचा विचार घेऊनच समाजातील सर्व क्षेत्रांत




कार्यकर्ता म्हणून काम करताना पक्ष संघटना हेच आपल्या सर्वांसाठी बळ आहे. देशाच्या विकास प्रक्रियेलाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंत्योदयाच्या मंत्राची जोड दिली.

प्रशिक्षण शिबिरामुळे आपल्या कार्याला गती मिळणार असून, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा अंत्योदयाचा आणि एकात्म मानवतेचा मंत्र आपल्या सर्वांसाठी आत्मा आहे.

समाजाच्या शेवटच्या घटकाला विकास प्रक्रियेत सामावून घ्यायचे आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाचा विकास होईल तेव्हाच देशाचा विकास होईल, हे उद्दिष्ट समोर ठेवून प्रत्येकाची वाटचाल असली पाहिजे.राजकीय व सामाजिक कार्यात आपली वैचारिक भूमिका स्पष्ट असली पाहिजे. 'राष्ट्र प्रथम' ही भावना आपल्या कृतीत असावी. पक्षाचे संस्कार हाच आपल्या कामाचा पाया असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या सुरू असलेल्या प्रत्येक कामाला विचारांची जोड आहे. म्हणूनच जगात देशाचे स्थान बळकट झाले असल्याकडे विखे पाटील यांनी लक्ष वेधले. भारतीय जनता पक्षाचा एक प्रशिक्षित कार्यकर्ता म्हणून समाजातील सर्व क्षेत्रांत आपल्याला काम करायचे आहे. लोकांना पक्षाशी जोडायचे आहे. भाजप हा एक परिवार आहे ही भूमिका घेऊन कार्यकर्त्यांना आपली कर्तव्ये बजावावी लागतील. चांगला संवाद, चांगले वर्तन आणि संघटना हे आपले बळ मानून पुढे जाण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. या प्रशिक्षण वर्गाचे स्वागत व प्रास्तविक जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी केले. सूत्रसंचालन सोशल मिडिया जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे यांनी व वर्ग प्रशिक्षण गीत सचिन भैरव व राजेश्वर श्रीराम यांनी सादर केले. वर्ग यशस्वी करण्यासाठी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर नगर जिल्हा अध्यक्ष नितीन दिनकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे, कांचनताई मांढरे, अशोक पवार, उपाध्यक्ष किरण बोरुडे, शिर्डी मंडल अध्यक्ष रविंद्र गोंदकर, योगेश गोंदकर, आनंद बुधेकर,अशोक भुसाळ यांनी विशेष प्रयत्न केले.

### प्रशिक्षण वर्गात यांनी केले मार्गदर्शन

महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांनी व्यावहारिक, आमदार विक्रम पाचपुते यांनी एकात्मता मानवतावाद, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी स्थानिक कार्यक्रम व बूथ प्रबंधन व मन की बात, माजी आमदार सुनील राणे यांनी कार्यकर्ता विकास, माजी आमदार राम सातपुते व प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी भाजपा कार्यविस्तार, प्रदेश प्रवक्ते अजित चव्हाण यांनी सोशल मिडिया व आय टी सेल, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांनी भाजपा चा इतिहास व विकास, प्रदेश सचिव भैरवी वाघ यांनी विचार परिवार, माजी प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी यांनी भाजपा कार्यपद्धती तर लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रेरणा होनराव यांनी गरीब कल्याण योजना व नारी शक्ती वंदना या विषयावर मार्गदर्शन केले.

# संत विठोबादादांच्या चरित्र कथेचा संभाजीनगरात भव्य सोहळा

## २८ मेपासून प्रारंभ- ३ जूनला सांगता; अधिकमासानिमित्त धार्मिक पर्वणी

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

पावन अधिकमासानिमित्त संत सद्गुरू श्रीविठोबादादा महाराज यांच्या चरित्र कथेचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा २८ मे ते ३ जून २०२६ या कालावधीत एन-८, सिडको येथील बळीराम पाटील शाळेजवळ असलेल्या 'सप्तपदी मंगल कार्यालय, अयोध्या नगर, येथे पार पडणार आहे. समस्त सद्गुरू श्रीचातुर्मास्यमहाराज गुरुभक्त परिवार, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने या धार्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संत सद्गुरू विठोबादादा महाराज चातुर्मास्ये हे संत भानुदास महाराजांचे अवतार मानले जातात. संतकवी दासगणू महाराज यांनीही आपल्या रचनेत ''तु पूर्वजन्मामाझारी भानुदास होतास'' असे लिहून याला दुजोरा दिला आहे. सतराशेच्या शतकात जालना जिल्ह्यातील श्रीक्षेत्र अन्वा (ता. भोकरदन) येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जवळच्याच वढोद गावी श्री मुरलीधर कुलकर्णी यांच्याकडे झाले, जिथे त्यांनी संस्कृत, व्यवहारलेखन, श्रीमद्भागवत आणि गीतेचे सखोल अध्ययन केले.

संत विठोबादादा महाराजांनी सलग १२ वर्षे पंढरीची वारी केल्यानंतर खुद्द श्रीविठ्ठलाने त्यांना सहकुटुंब 'चातुर्मास्य' वारी करण्याची व कीर्तनसेवा करण्याची आज्ञा दिली. पंढरपूर येथील त्यांच्या कीर्तनाला भाविकांची अलोट गर्दी होत असे. त्यांच्या भक्तीची ख्याती सांगणारी एक अद्भुत कथा इतिहासात जोडलेली आहे. एका वारीच्या वेळी एका वृद्ध आजीने गर्दीमुळे दर्शन न मिळाल्याने देवाच्या चरणी एक नारळ अर्पण केला होता. तो नारळ मंदिरातील पुजाऱ्यांनाही काढता येत नव्हता. शेवटी पुजाऱ्यांना दृष्टांत झाला की, हा नारळ माझ्या लाडक्या विठोबा दादा चातुर्मास्ये यांचा आहे. जेव्हा विठोबादादांनी मंदिरात येऊन देवापुढे पदर पसरला, तेव्हा तो नारळ चटकन त्यांच्या पदरात पडला.

या चमत्कारानंतर संपूर्ण पंढरपुरात सद्गुरु विठोबा दादामहाराज की जय, असा जयघोष झाला आणि त्यांना 'चातुर्मास्ये' हे नाव मिळाले. सद्गुरु दादा महाराजांनी मराठवाडा, विदर्भ, संपूर्ण महाराष्ट्र तसेच मध्य प्रदेशात भागवत धर्माचा मोठा प्रचार-प्रसार केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांना आदराने महेश्वर नगरीत नेले होते, तर आर्याकार महाराष्ट्रकवि मोरोपंत हे आपले कोणतेही काव्य सद्गुरु विठोबादादांना दाखवल्याशिवाय प्रकाशित करत नसत, इतका त्यांचा घनिष्ठ स्नेह होता. ३६ वर्षे चातुर्मास सेवा केल्यानंतर त्यांनी श्रावण वद्य त्रयोदशीला पंढरपूर येथे चंद्रभागेच्या तीरावर समाधी घेतली. संतश्री विठोबा दादा महाराज चातुर्मास्ये संस्थान श्रीक्षेत्र अन्वा व पंढरपूर चे पंधरावे पीठाधिश प.पू.सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली महाराज चातुर्मास्ये कथा निरूपण करणार आहेत.

# जालन्यात पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे आगमन जिल्हाधिकारी मित्तल यांच्याहस्ते स्वागत

## मराठवाड्यात लॉजिस्टिक क्रांतीची नांदी




जालना । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या औद्योगिक आणि लॉजिस्टिक क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणारा महत्त्वपूर्ण मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्क (एमएमएलपी) अर्थात ड्राय पोर्ट प्रकल्पात २५ मे २०२६ रोजी पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे यशस्वी आगमन झाले. या पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्वागत केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जालना ड्रॉयपोर्टचे व्यवस्थापक विकास मलिक यांच्यासह अधिकारी आणि उद्योजकांची उपस्थिती होती. यामुळे जालना आणि संपूर्ण मराठवाडा विभागात रेल्वे-संलग्न मालवाहतूक सेवांची औपचारिक सुरुवात झाली आहे.

पहिली इनबाउंड कंटेनर रेक 'पोलाद स्टील' कंपनीसाठी स्पंज आयर्न घेऊन एमएमएलपी जालना येथील रेल्वे सायडिंगवर दाखल झाली. या यशस्वी ट्रायलमुळे उद्योगांसाठी रेल्वे, रस्ता आणि बंदर यांचा समन्वय साधणाऱ्या एकात्मिक मल्टी मॉडेल मालवाहतुकीची नवी दारे खुली झाली आहेत. विशेष म्हणजे, राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक्स व्यवस्थापन लिमिटेड या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण च्या पूर्ण मालकीच्या उपकंपनीमार्फत आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण यांच्या सहकार्याने उभारण्यात आलेला हा देशातील पहिलाच ड्राय पोर्ट/मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्क प्रकल्प आहे. ''महाराष्ट्र एमएमएलपी प्रायव्हेट लिमिटेड' या विशेष उद्देश वाहन अंतर्गत हा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या 'पीएम गतिशक्ती' आणि राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणांतर्गत विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होणे, मालवाहतुकीची कार्यक्षमता वाढणे, रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होणे, कार्बन उत्सर्जनात घट आणि इंधन बचत होण्यास मोठी मदत होणार आहे. पर्यावरणपूरक आणि शाश्वत मालवाहतूक व्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुमारे ६४.५१ एकर क्षेत्रात कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच, आयात-निर्यात व्यवहारांसाठी आवश्यक असलेली सीमाशुल्क विभागाची वैधानिक मान्यता देखील या प्रकल्पाला प्राप्त झाली आहे. त्यामुळे आता जालन्यासह मराठवाड्यातील उद्योगांना थेट आयात-निर्यात माल हाताळणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. एमएमएलपी जालना प्रकल्पामुळे मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक आकर्षित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याशिवाय रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असून, अंतर्गत महाराष्ट्रातील निर्यात-आयात व्यापाराला नवी गती मिळेल. जालना ते जेएनपीए बंदर तसेच राष्ट्रीय लॉजिस्टिक्स कॉरिडॉरशी थेट जोडणी झाल्याने उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी भारतीय रेल्वे, सीमाशुल्क विभाग, महाराष्ट्र शासनाच्या विविध यंत्रणा तसेच संबंधित सर्व भागधारकांनी केलेल्या समन्वित प्रयत्नांचे जालना जिल्हा प्रशासनाने कौतुक केले आहे. पहिल्या ट्रायल कंटेनर रेकच्या यशस्वी आगमनामुळे जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा विभागात लॉजिस्टिक-आधारित औद्योगिक विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे.

# हिंगोली-औंढा मार्गावर दुचाकीच्या अपघातात तरुणाचा मृत्य

हिंगोली

हिंगोली ते औंढा नागनाथ मार्गावर हिवराजाटू शिवारात दुचाकी अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी ता. २५ रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. मयत तरुणाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंढा नागनाथ तालुक्यातील पिंपळा येथील रहिवासी असलेला इंद्रजीत मारकड (२४) हा औंढा तालुक्यातील कुंडकर पिंपरी शिवारातील सौर उर्जा प्रकल्पावर कामावर आहे. नेहमी प्रमाणे इंद्रजीत हा सकाळी कामावर गेला होता. रात्रीच्या सुमारास काम आटोपून तो परत गावाकडे पिंपळा येथे दुचाकी वाहनाने निघाला होता. औंढा नागनाथ ते हिंगोली मार्गावर हिवरा जाटू शिवारात त्याच्या दुचाकी वाहनाला अपघात झाला अन तो रस्त्यावर कोसळला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

या अपघाताची माहिती मिळताच औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे निरीक्षक जी. एस. राहिरे, उपनिरीक्षक अमोल इंगोले, जमादार रवीकांत हरकाळ, सुरेश रणखांब, किशोर पारीसकर, विजय कालवे, यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी इंद्रजीत यास तातडीने हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल केले.

# श्रीगोंदे तालुक्यात जिलेटिन स्फोटकांचा काळाबाजार

## दुचाकी आणि खासगी गाड्यांमधून घातक साहित्याची होतेय धोकादायक पद्धतीने वाहतूक

श्रीगोंदे। प्रतिनिधी

श्रीगोंदे तालुक्यात विहिरींचे खोदकाम, शेततळे आणि दगडखाणींसाठी मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या जिलेटिन आणि डिटोनेटर सारख्या घातक स्फोटक साहित्याचा काळाबाजार उघडपणे सुरू आहे. या प्रकाराकडे महसूल आणि पोलिस यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याने, स्थानिक नागरिकांमधून तीव्र संशय आणि संताप व्यक्त केला जात आहे. काही महिन्यांपूर्वी श्रीगोंदे तालुक्यातील टाकळी कडेवळीत गावात विहिरीचे खोदकाम सुरू असताना जिलेटिनच्या कांड्यांचा भीषण स्फोट झाला होता. या दुर्घटनेत तीन निष्पाप कामगारांचा जागीच मृत्यू झाला होता, तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले होते. एवढी मोठी जीवघेणी दुर्घटना घडूनही प्रशासनाने यातून धडा घेतलेला नाही. तालुक्यात अवैध स्फोटकांचा सुळसुळाट आजही जसाच्या तसा कायम असल्याचे चित्र आहे.

विहिरींचे खोदकाम वेगाने उरकण्यासाठी खाजगी कंत्राटदार कोणत्याही सुरक्षा परवानग्या न घेता काळ्या बाजारातून चढ्या दराने जिलेटिन कांड्या खरेदी करत आहेत. पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संस्थोच्या नियमांनुसार, स्फोटके ठेवण्यासाठी आणि वाहून नेण्यासाठी विशेष वाहने व तज्ज्ञ व्यक्तींची आवश्यकता असते. मात्र, तालुक्यात सर्रास दुचाकी किंवा खाजगी चारचाकी गाड्यांमधून या साहित्याची धोकादायक वाहतूक केली जात आहे. टाकळी कडेवळीतच्या दुर्घटनेनंतर पोलिसांनी कंत्राटदारावर गुन्हा दाखल केला, मात्र या स्फोटकांचा मुख्य पुरवठादार कोण? याचे अवैध जाळे कोण चालवते? याचा तपास अद्याप पुढे सरकलेला नाही. श्रीगोंदे तालुक्यातील सर्व विहिरींच्या खोदकामांची आणि दगडखाणींची तातडीने तपासणी व्हावी. अनधिकृतपणे जिलेटिन विकणाऱ्या मुख्य पुरवठादारांवर 'मोक्का'अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. अनधिकृतपणे स्फोटकांचा साठा आढळल्यास कारवाई बेलवंडी पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात जर अशा गोष्टी निदर्शनास आल्या, तर संबंधितांकडे अधिकृत लायसन्स आहे का, याची खात्री करून तपासणी केली जाईल. जर कुठेही अनधिकृतपणे स्फोटकांचा वापर किंवा साठा सुरू असल्याचे आढळले, तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नंदकुमार सोनवलकर, प्रभारी निरीक्षक, बेलवंडी पोलिस स्टेशन.

## जाहीर प्रगटन

बीड जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, माझे अशील नामे १) विलास अंबादास शेंडगे, रा. खापरपांगरी, ता.जि. बीड २) सुरेश लक्ष्मण नवले, रा. पाली, ता.जि.बीड

यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरुन व दाखवलेल्या कागदपत्रांवरुन व अधिकृत केल्यावरुन मी सर्वांच्या माहिती करीता हे जाहिर प्रगटन देत आहे. की, प्लॉट र.डी.जि.प. बीड सब डि.पं.स. व ता.बीड पैकी कसबे बीड तरफ बलगुजार येथील नगर परिषद हद्दिचे बाहेरील सर्वे नं. ८७ मधील रो संभाजीनगर-४ मधील प्लॉट क्र. ६३ ज्यास ग्रा.पं. वासनवाडी मालमत्ता क्र. ४९२९ असा मिळालेला आहे. ज्याची लांबी पूर्वपश्चिम १२ मीटर व रुंदी दक्षिण उत्तर ९ मीटर आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १०८ चौ.मी. आहे. पैकी राऊडिंग क्षेत्र ४.३५१ चौ.मी. वजा जात निव्वळ प्लॉटचे क्षेत्रफळ १०३.६४९ चौ.मी. ज्याची चतुः सिमाः- पुर्वेसः-याच लेआऊट मधील ९ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस याच लेआऊट मधील प्लॉट क्र. ५४ दक्षिणेस याच लेआऊट मधील ९ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस :- याच लेआऊट मधील प्लॉट क्र. ६२ असुन चतुः सिमेचे आतील प्लॉट खरेदीखत करुन देणार आहेत. उपरोक्त वर्णनाची प्लॉट मालक १) विवेक दत्तु मोटे, रा. चौसाळा, ता. बीड, २) परमेश्वर माणिकराव आमटे, रा. खांडे पारगांव, ता. बीड, ३) बाबु आण्णासाहेब भावले, रा. धनगरवाडी, ता. बीड यांनी आमच्या आशिलास असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट हा पुर्णपणे निर्विवाद, निंजोखीम असुन सदर प्लॉट च्या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही आथवा प्रलंबीत नाही. तसेच सदर प्लॉट कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक, पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉट संपादित झालेला नाही. अथवा तशी नोटीस प्लॉट धारकास आलेली नाही. त्यांनी माझ्या पक्षकारा शिवाय ईतरा सोबत सदर प्लॉट संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्युपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. व्दारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. वरील प्लॉट खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार गाहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहिर प्रगटन दिल्या पासुन १५ दिवसाचे आत संपुर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले लेखी आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह नोंदवावीत अन्यथा सदर व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत

करण्यात येईल. व मुदती नंरत कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.
मार्फत :- ॲड. शैलेंद्र कांबळे
जिल्हा सत्र न्यायालय बीड.
ठिकाण : बीड.
दिनांक : २७/०५/२०२६

जाहिर प्रगटन देणार
१) विलास अंबादास शेंडगे,
२) सुरेश लक्ष्मण नवले

## मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७७६/२०२६**
**( मार्फत विधिज्ञः- ॲड बी एन तावरे )**

अर्जदार :-१. कानुपात्रा भ्र. मसाजी निरधार, वय ७० वर्षे, धंदा घरकाम रा. वायभटवाडी, ता.जि.बीड, २. कलावती भ्र. रामकृष्ण मसवले, वय ७२ वर्षे रा. कारळवाडी, ता.जि.बीड, धंदा शेती, ३. निलावती भ्र. बन्सी ताटे, वय ६८ वर्षे, धंदा शेती, रा. जुजगव्हाण, ता.जि.बीड, ४. सुमन भ्र. वैजिनाथ थापडे, वय ७५ वर्षे रा. ढेकणमोहा, ता.जि.बीड, धंदा शेती, विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे मंजुळाबाई भ्र. सुखदेव सुस्कर हे / हया दिनांक २७/०९/२०१५ रोजी जुजगव्हाण, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ ते ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास अजुन दोन मुली नामे अनुसया सुखा सुस्कर व सरस्वती सुखा सुस्कर हया होत्या, त्या अनुकमे १२.०७.१९७० व ०६.१२.१९८० रोजी मयत झालेल्या आहेत. मयतास मुलगा नाही. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांकः- ०८/०५/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः २५/०६/२०२६.

आदेशावरुन
स्वाक्षरीत - /
अधिक्षक, दिवाणी न्यायालय,
व. स्तर, बीड

# विहाररत जैन साध्वींच्या मृत्यूप्रकरणी चौकशी करा जैन समाजाची मागणी

अंबड । प्रतिनिधी

दुर्दैवी मृत्यूनंतर जैन समाज आक्रमक; निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशीसह ''राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण''ची मागणी मध्य प्रदेशात दिनांक २० मे २०२६ रोजी कलेक्ट्रेट भवनासमोर विहाररत जैन साध्वी आर्यिका श्री १०५ श्रुतमति माताजी व आर्यिका श्री १०५ उपशममति माताजी यांच्या झालेल्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर देशभरातील जैन समाजात तीव्र संताप व शोक व्यक्त केला जात आहे. राष्ट्रसंत आचार्य श्री १०८ विद्यासागर जी महाराज यांच्या शिष्यांचा झालेला असामयिक मृत्यू अत्यंत वेदनादायी असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. ही घटना केवळ साधा रस्ता अपघात नसून या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जैन समाजाकडून करण्यात आली आहे. उपलब्ध व्हिडिओ क्लिप व इतर तथ्यांच्या आधारे समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण घटनेची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.




जैन साधू-संत हे पूर्णतः अहिंसक, निःशस्त्र आणि पायी विहार करणारे तपस्वी असतात. ते कोणत्याही प्रकारची सुरक्षा किंवा सुविधा स्वीकारत नाहीत आणि समाजाला अहिंसा, संयम व शांततेचा संदेश देतात. अशा संतांवर वाढत्या दुर्घटना आणि हल्ल्यांच्या घटना अत्यंत चिंताजनक असल्याचे जैन समाजाने म्हटले आहे. जैन समाजाने शासन व प्रशासनासमोर काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये या प्रकरणाची सीबीआय किंवा न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, घटनेतील सर्व फुटेज, व्हिडिओ व डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवण्यात यावेत तसेच दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच विहाररत साधू-संतांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात यावा, संवेदनशील भागात पोलिस संरक्षण, वाहतूक नियंत्रण, चेतावणी फलक व महामार्गांवर विशेष खबरदारी घेण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. केंद्र सरकारने ''राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण'' लागू करून पायी विहार करणाऱ्या संतांसाठी विशेष सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे () तयार करावीत, अशी मागणी जैन समाजाने केली आहे. याशिवाय संतांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना विशेष संवेदनशील श्रेणीत समाविष्ट करण्यात यावे तसेच स्थानिक स्तरावर “ ” स्थापन करून प्रशासन व समाज यांच्यात समन्वय व्यवस्था निर्माण करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. जैन समाजाने इशारा दिला आहे की, संतांच्या सुरक्षेबाबत ठोस निर्णय न घेतल्यास देशभरात तीव्र आंदोलन उभारले जाईल.

# दारू दुकानात कामगाराचा खून ‘एलसीबी’ने बालेपीरमधील आरोपीच्या मुसक्या आवळल्या

बीड । प्रतिनिधी

दारूच्या दुकानात हिशोबाच्या कारणावरून झालेल्या वादातून कामगाराचा खून करणाऱ्या आरोपीला बीड स्थानिक गुन्हे शाखेने मोठ्या शिताफीने अटक केली आहे. शेख इरफान ऊर्फ लाला शेख समद (वय ३८, रा. आमराई, नगर रोड, बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी खुनाचा आणि ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत उमेश नवनाथ दळवी (वय ३५, रा. गोरेवस्ती, बालेपीर, बीड) हे एका दारूच्या दुकानात कामाला होते. आरोपी शेख इरफान ऊर्फ लाला याने ’तू दुकानात व्यवस्थित काम करत नाहीस’ या कारणावरून त्यांना आधीही मारहाण केली होती. त्यानंतर दिनांक २३ मे २०२६ रोजी दुकानात हिशोबावरून पुन्हा घोळ झाल्याचे कारण समोर आले. याच वादातून आरोपी शेख इरफानने उमेश दळवी यांना बेदम मारहाण करून जीवे मारले. याप्रकरणी मयताची पत्नी संगीता उमेश दळवी (वय २८) यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून आरोपीविरुद्ध भा.न्या.सं. कलम १०३(१) आणि अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. तपास दरम्यान पोउपनि श्रीराम खटावकर यांच्या विशेष पथकाला गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, आरोपी हा बालेपीर भागातच लपून बसलेला आहे. मिळालेल्या पान ३ वर

### या पथकाने केली कामगिरी

**सदरची धडक कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि श्रीराम खटावकर, अंमलदार अशोक दुबाले, राहुल शिंदे, युनुस बागवान, अशफाक सय्यद, मनोज परजणे, अश्विन सुरवसे आणि नितीन वडमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.**



# नगराध्यक्षांनी ‘त्या’ आजीला दिला धीर म्हणाल्या पुन्हा त्रास होणार नाही



बीड । प्रतिनिधी

शहरातील नवी भाजी मंडई येथे अतिक्रमणावर कारवाई करत असतांना एका भाजी विक्रेत्या महिलेची भाजी तसेच जेवणाचा डब्बा बळजबरीने उचलून ट्रॅक्टरमध्ये फेकल्याचा प्रकार घडला होता. या प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्याविरूध्द निलंबनाची कारवाई केल्यानंतर आज सकाळी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी संबंधित महिलेच्या घरी जाऊन त्यांना साडी-चोळी देत भविष्यात आपण पुर्ण ताकदीने पाठीशी असल्याचा विश्वास दिला. एवढेच नव्हे तर नवी भाजी मंडईत योग्य ठिकाणी जिथे अतिक्रमण नसेल त्या ठिकाणी पान ३ वर

# न.प.बीडमधील गणेश पगारेचे कथित भ्रष्टाचार प्रकरण

## चौकशी न झाल्यास उद्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण -अक्षय कोकाटे

बीड । प्रतिनिधी

नगर परिषद बीड येथील कथित करोडो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करत संबंधितांविरोधात दिलेल्या निवेदनांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत आता आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.




याबाबत मा. जिल्हाधिकारी बीड यांना दि. २९ एप्रिल २०२६ रोजी तसेच मा. मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांना दि. २३ एप्रिल २०२६ रोजी निवेदन देण्यात आले होते. या निवेदनामध्ये नगर परिषद बीड येथील आस्थापना, लेखा, स्वच्छता आदी विभागांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांकडून कथित आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या मुलगा व मुलगी यांची नगर परिषदेत सफाई कामगार म्हणून झालेली नियुक्ती, त्यांची ऑर्डर प्रक्रिया व भरतीची वैधता याबाबतही चौकशीची मागणी करण्यात आली होती. यासंदर्भात श्री. गणेश तुळशीराम पगारे, पान ३ वर

# शिंदे सेनेच्या नेत्यावर प्राणघातक हल्ला

## हाताची बोटे निकामी, प्रकृती चिंताजनक

परळी । प्रतिनिधी

परळी येथे शिंदे सेनेचे वरिष्ठ नेते शिवाजी शिंदे यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केल्याने ते गंभीर जखमी झाले आहे. त्यांना उपचारासाठी तातडीने परळी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वराती येथे पाठवण्यात आले. हल्लेखोर फरार झाले असून परळी पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

बीड जिल्ह्यातील परळी शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. परळीतील मोंढा बाजार परिसरात शिंदे सेनेचे ज्येष्ठ नेते शिवाजी शिंदे यांच्यावर काही अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने भीषण हल्ला केला. या जीवघेण्या हल्ल्यात शिवाजी शिंदे गंभीररीत्या जखमी झाले असून परिसरात कमालीची घबराट पसरली आहे. हल्ल्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून पोलीस सध्या त्यांचा कसून शोध घेत आहेत.

शिवाजी शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते नेहमीप्रमाणे परळी शहरातील मोंढा मार्केट भागात असलेल्या आपल्या रिद्धी सिद्धी दुकानात पत्नीसह उपस्थित होते. दुपारच्या सुमारास ते हॉटेलवर असताना, अचानक काही तरुण तेथे आले आणि त्यांनी थेट कोयत्याने शिवाजी शिंदे यांच्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. हल्लेखोराने थेट शिवाजी शिंदे यांच्या डोक्याला लक्ष्य करून कोयत्याचा वार केला. मात्र, स्वतःचा जीव वाचवण्यासाठी शिंदे यांनी तो वार हातावर झेलला. यात त्यांच्या हाताची बोटे गंभीर जखमी झाली.

# केजमध्ये अवकाळी पाऊस व वादळाचा कहर , शेतकऱ्यांच्या मदतीला शिवसेना सरसावली

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफ वडगाव महसूल मंडळ आणि परिसरात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. तसेच वीज कोसळून मृत्यू झालेल्या शेतकरी दिगांबर भीमराव ससाणे यांच्या कुटुंबीयांना शासनाने त्वरित मदत जाहीर करावी, अशी मागणी करत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

### शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी

सोमवारी युसूफ वडगाव महसूल मंडळ परिसरात ताशी ९० ते १२० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. या नैसर्गिक आपत्तीमुळे धनेगाव, नायगाव, सादोळा, भालगाव, बावची, सोने सांगळी, सुर्डी, थापरी आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



झाडे उन्मळून पडली असून वीज तारा तुटल्या आहेत. अनेक ठिकाणी रोहित्र कोसळल्याने वीजपुरवठाही विस्कळीत झाला आहे. तसेच शेतीपिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या दरम्यान सोनीजवळा येथील शेतकरी दिगांबर भीमराव ससाणे यांचा अंगावर वीज पडल्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मृत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करा

अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून शासनाकडून नुकसानभरपाई देण्यात यावी तसेच मृत शेतकरी दिगांबर ससाणे यांच्या कुटुंबीयांना विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शिवसेनेच्या माजी आमदार पान ३ वर

# महावितरणचा शॉक मान्सूनपूर्व कामांचा पुरता बोजवारा!

केज । प्रतिनिधी

पावसाळा तोंडावर आलेला असतानाही केज तालुक्यात महावितरणकडून केल्या जाणाऱ्या मान्सूनपूर्व कामांचा पुरता बोजवारा उडाला आहे. स्थानिक उपअभियंत्यांच्या सुस्त कारभारामुळे तालुक्यातील अनेक भागांत अद्याप दुरुस्तीची कामे झालेली नाहीत. तर काही ठिकाणी झालेली कामे अत्यंत निकृष्ट आणि थातूरमातूर स्वरूपाची असल्याचा गंभीर आरोप कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर यांनी केला आहे. या प्रकरणी प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास शेतकऱ्यांच्या साथीने महावितरणविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



या संदर्भात डॉ. नेहरकर यांनी थेट मुख्य अभियंता (महावितरण कार्यालय, लातूर) यांना निवेदन पाठवून वीज वितरण कंपनीच्या ढिसाळ कारभाराचे वाभाडे काढले आहेत.

महावितरणच्या अधिकृत यंत्रणेऐवजी केज तालुक्यात विद्युत दुरुस्तीची कामे अनधिकृत रित्या खाजगी कंपन्यांकडून करून घेतली जात असल्याचा खळबळजनक आरोप डॉ. नेहरकर यांनी निवेदनात केला आहे. या कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा दर्जा राखला गेलेला नाही. केवळ कागदोपत्री घोडे नाचवून निधी लाटण्याचा प्रकार सुरू असल्याचा संशय आता व्यक्त होत आहे.

तालुक्यातील अनेक गावांतील रोहित्रांमधून मोठ्या प्रमाणात तेल गळती होत आहे. यामुळे तांत्रिक बिघाड होऊन ऐन पेरणीच्या काळात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे.

उघडे डीपी बॉक्स: अनेक गावांमध्ये आणि शेतशिवारात विद्युत डीपी बॉक्स उघड्या अवस्थेत मृत्यूचे सापळे बनून उभे आहेत. पावसाळ्यात यामुळे शॉर्ट सर्किट होऊन मोठी जीवितहानी किंवा वित्तहानी होण्याची भीती निर्माण झाली आहे.

कागदावरच मान्सूनपूर्व कामे: जी काही कामे झाल्याचा दावा केला जात आहे, ती अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाची असून पहिल्याच पावसाच्या सरीमध्ये ती वाहून जाण्याची शक्यता आहे.

केज तालुक्यातील शेतकऱ्यांचा जीव धोक्यात घालून महावितरण प्रशासन ढाराढूर झोपले आहे का? मान्सूनपूर्व कामे केवळ कागदावर दाखवून जनतेची दिशाभूल केली जात आहे. जर वेळेत कामे पूर्ण झाली नाहीत आणि उघड्या डीपीमुळे किंवा निकृष्ट कामांमुळे कोणतीही दुर्घटना घडली, तर त्याला सर्वस्वी महावितरण प्रशासन जबाबदार असेल असेही डॉ. वासुदेव नेहरकर यांनी म्हटले आहे.

डॉ. वासुदेव नेहरकर यांनी महावितरणच्या कारभारातील आणखी एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार उघडकीस आणला आहे. तालुक्यातील अनेक लाईनमन (तारतंत्री) हे स्वतःच्या ड्युटीच्या गावी हजर न राहता, त्यांनी आपल्या जागी अनधिकृतपणे खाजगी माणसे ठेवली आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, ही खाजगी माणसे सतत दारूच्या नशेत असतात. अशा मद्यधुंद अवस्थेतच त्यांच्याकडून वीज प्रवाहाचे परमिट घेतले आणि दिले जाते. दारूच्या नशेत होणाऱ्या या खेळामुळे तालुक्यात कधीही मोठी दुर्घटना होऊन मोठी जीवितहानी होऊ शकते, असा थेट जाब डॉ. नेहरकर यांनी महावितरणला विचारला आहे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर आणि कंत्राटदारांवर कडक फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता महावितरण प्रशासन या गंभीर इशाऱ्यानंतर खडबडून जागे होणार की शेतकऱ्यांच्या तीव्र आंदोलनाचा सामना करणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त

# शिक्षण संवाद यात्राचा समारोप

माजलगाव । प्रतिनिधी

मातंग समाजातील शिक्षणाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने मातंग समाजाचे नेते अमोल शेरकर यांनी सुरू केलेल्या शिक्षण संवाद यात्राचा समारोप कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज, दि. २५ मे रोजी तेलगाव येथे करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मारकाला अभिवादन करून या यात्रेची सुरुवात करण्यात आली होती. मागील दीड महिन्यापासून माजलगाव, वडवणी आणि धारूर तालुक्यातील तब्बल ६० गावांमध्ये ही यात्रा पोहोचली. गावोगावी



जाऊन मातंग समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, शिक्षण गळतीची कारणे समजून घेणे आणि समाजात शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हा यात्रेचा प्रमुख उद्देश होता.

या यात्रेदरम्यान मातंग समाजातील अनेक कुटुंबांशी संवाद साधण्यात आला. समाज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर का राहतो, तरुण पदवीधर झाल्यानंतर पुढील शिक्षण किंवा स्पर्धा परीक्षांकडे का वळत नाहीत, यासारख्या प्रश्नांवर चर्चा करून त्यावर उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला.अमोल शेरकर यांनी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या पान ३ वर

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक यादी प्रसिद्ध

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यानुसार उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची मराठी व इंग्रजी प्रारूप मतदार यादी दिनांक २२.०५.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रारूप मतदार यादी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायती यांच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच धाराशिव जिल्ह्याच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर प्रारूप मतदार यादीबाबत आक्षेप / दावे / हरकती असल्यास दिनांक २९.०५.२०२६ पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी, उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या कार्यालयात किंवा जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायती यांच्या कार्यालयात अथवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा पान ३ वर

# श्री.योगेश्वरी मंदिरात ‘ज्ञानप्रसादालय’ ग्रंथालयाचे लोकार्पण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई ‘‘बुके नको, पुस्तक द्या’’ या अभिनव संकल्पनेतून अंबाजोगाई शहरात उभारण्यात आलेल्या ‘ज्ञानप्रसादालय’ या ग्रंथालयाचे उद्घाटन शनिवारी श्री. योगेश्वरी मंदिर परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. वाचन संस्कृती जपण्याचा आणि समाजात ज्ञानाचा प्रसार करण्याचा संदेश देणारा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

अंबाजोगाई ‘‘पुस्तकांचं गाव’’ या संकल्पनेला बळ देत



रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि श्री. योगेश्वरी देवल कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम साकारण्यात आला. मंदिर परिसरात सुरू करण्यात आलेले हे ग्रंथालय भक्तांसाठी ज्ञानाचे नवे दालन ठरणार असून धार्मिक स्थळासोबतच बौद्धिक समृद्धीचे केंद्र म्हणूनही या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे होते. उद्घाटक म्हणून देवल कमिटीचे सचिव गिरधारीलालजी भराडिया उपस्थित होते. यावेळी रोटरीचे उपप्रांतपाल प्रवीण देशपांडे, प्रांतसचिव डॉ. राजगोपाल तापडिया, देवल कमिटीचे विश्वस्त कमलाकर चौसाळकर, उल्हास पांडे, हंसराज देशमुख, प्रवीण दामा, पूजा कुलकर्णी, गौरी जोशी, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर, सहप्रकल्प प्रमुख धनराज सोळंकी, सौ. संगीता लातुरे, शर्मिष्ठा देशपांडे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

# महागाई, बेरोजगारी व पेपरफुटी विरोधात जन आक्रोश

## प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी; अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा- नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर तात्काळ कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जन आक्रोश आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी केले.




आंदोलनादरम्यान पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या महागाई आणि तुटवड्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच पेपरफुटी प्रकरण, सुशिक्षित बेरोजगारी, शहरातील अतिक्रमण, रस्ते विकास, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न, खाजगी कोचिंग क्लासेसचे बाजारीकरण, सोशल मीडियावरील निर्बंध आणि विविध प्रलंबित प्रशासकीय मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.आंदोलनकर्त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. बीड नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमण तात्काळ हटवावे, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रोड चौक या मार्गावरील रस्त्याचे काम पूर्ण करावे, तसेच नगरपरिषद निवृत्त पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26